POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकारी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२३० ● मुंबई, मंगळवार, २४ मार्च २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## मुंबईकरांना लाखो लिटर पाणी लागणार

### १५ वर्षात आणखी ३ हजार दशलक्ष लिटर पाण्याची गरज



■ बातमी /लेख,
प्रीती दिपक नाईक

मुंबईची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून मुंबई उपनगराचा विकास झपाट्याने होत आहे. सद्यस्थितीत मुंबईची लोकसंख्या १ कोटी ४० लाखांच्या घरात पोहोचली आहे. भविष्यात आणखी वाढतच जाणार असून २०४१ पर्यंत मुंबईची १ कोटी ७२ लाखांच्या घरात पोहोचेल, असे जाणकार सांगतात.

वाढत्या लोकसंख्येमुळे पिण्याच्या पाण्याच्या मागणी वाढ होणार असून ६,५३५ दशलक्ष लिटर पाण्याची गरज भासणार आहे. गारगाई, समुद्राचे खारे पाणी गोडे करणे असे पाण्याचे नवीन स्रोत निर्माण केले जात असले तरी ते किती यशस्वी होतील, याची शाश्वती कोणच देऊ शकत नाही. त्यामुळे भविष्यात पाणी प्रश्न पेटणार, अशी चिन्हे दिसू लागली आहेत.

आडव्या उभ्या मुंबईचा विकास झपाट्याने होत असून लोकसंख्येत ही झपाट्याने वाढ होत आहे. पुढील १५ वर्षात म्हणजेच २०४१ मध्ये मुंबईची लोकसंख्या दोन कोटींच्या घरात असेल. वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत पिण्याच्या पाण्याच्या मागणीत लक्षणीय वाढ होणार असून पुढील १५ वर्षात तब्बल २ हजार ८९१ दशलक्ष लिटर आणखी पाण्याची गरज भासणार आहे. पाण्याची वाढती मागणी लक्षात घेता गारगाई, पिंजाळ व दमणगंगा पिंजाळ नदी जोड प्रकल्प हाती घेण्यात येत आहेत. मनोरी येथील समुद्राचे खारे पाणी गोडे करण्याची वर्क ऑर्डर देण्यात आली असून हे सगळे प्रकल्प पुढील तीन ते चार वर्षात पूर्ण होतील, असा दावा पालिका प्रशासनाने केला आहे.

**वातावरण बदल, पाणी वाया गेल्याने टंचाई**

वातावरणीय बदलामुळे पावसाचे आगमन लांबणीवर पडते किंवा अपेक्षाच्या तुलनेत कमी बरसतो. त्यामुळे गेल्या काही वर्षात पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू लागली असून भारतासारख्या प्रगतशील देशात महाराष्ट्रासह अनेक राज्यांत दरवर्षी पाणीबाणीची स्थिती उद्भवते. मुंबई देशाची आर्थिक राजधानी आणि आशिया खंडातील सर्वात श्रीमंत महापालिका आहे. मुंबईकरांची तहान भागवण्यासाठी नियोजन पद्धतीने स्वच्छ व शुद्ध पाणीपुरवठा होतो. मात्र, भविष्यात पाण्याची टंचाई निर्माण होणार याचे संकेत मिळत असताना ही मुंबईकर पाणी वाया घालवण्यात धन्यता मानतात.

**चोरी, गळतीमुळे पाण्याची नासाडी**

मुंबईला सद्यस्थितीत दररोज ३,९५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होत असून २७टक्के पाणी चोरी व गळतीमुळे वाया जाते. तर भविष्यात वाढत जाणाऱ्या लोकसंख्येचा विचार करता पाण्याची गरज वाढणार आहे. त्यामुळे पाणी जपून वापरा, पाणी आडवा, पाणी जिरवा, पाण्याची गरज लक्षात घेता लोकांमध्ये जागृती केली जाते. मात्र मुंबईत पाण्याची नासाडी पहाता मुंबईकरांना 'पाणी हे अनमोल' जल हैं, पाण्याशिवाय सजीव जगू शकत नाहीत, याचा विसर पडला आहे.

मोडक सागर, मध्य वैतरणा, अप्पर वैतरणा, भातसा, तानसा विहार व तुळशी या सात धरणांतून मुंबईला दररोज ३,९५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होतो. सध्या मुंबईची लोकसंख्या १ कोटी ४० लाखांच्या घरात आहे. हीच लोकसंख्या २०४१ मध्ये १ कोटी ७२ लाख असेल, असा आकडा पालिकेच्या जल विभागाने अंदाजित केला आहे. २०४१ च्या आकडेवारीनुसार पिण्याच्या पाण्याच्या मागणीत वाढ होणे अपेक्षित आहे. पिण्याच्या पाण्याची वाढती मागणी लक्षात घेता गारगाई (४४० दशलक्ष लिटर्स प्रतिदिनी), पिंजाळ (८६५ दशलक्ष लिटर्स प्रतिदिनी) व दमणगंगा पिंजाळ नदी जोड प्रकल्प (१,५८६ दशलक्ष लिटर्स प्रतिदिनी) हे नवीन स्रोत विकसित करण्याची कार्यवाही सुरु केली आहे. हे प्रकल्प पूर्ण झाल्यावर मुंबईच्या पाणीपुरवठ्यात प्रतिदिनी २,८९१ दशलक्ष लिटर्स इतकी वाढ होईल, असा दावा पालिका प्रशासनाने केला आहे.

## शहीद दिनानिमित्त ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन





■ठाणे। प्रतिनिधी,

शहीद दिनानिमित्त जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, उपजिल्हाधिकारी सजेर्राव मस्के– पाटील, शशिकांत गायकवाड, वरूणकुमार सहारे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, तहसिलदार सचिन चौधर, रेवण लेंभे, मीनल दळवी, कार्यकारी दंडाधिकारी पुरुषोत्तम थोरात, लेखाधिकारी आश्लेषा जाधव, राष्ट्रीय सूचना व विज्ञान केंद्राचे संचालक घनश्याम मेहता तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## नुकसान भरपाईसाठी 'हायवे रोको'



■कणकवली। प्रतिनिधी,

सिंधुदुर्गात आंबा आणि काजू पिकाला नुकसान भरपाई मिळावी या मागणीसाठी सोमवार २३ मार्च रोजी सकाळी साडेदहा वाजता नांदगाव येथे मुंबई – गोवा महामार्ग रोखण्यात येणार आहे. शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील सर्व आंबा– काजू बागायतदार व शेतकरी सहभागी होणार आहेत. बदलत्या हवामानामुळे आणि अवकाळी पावसामुळे जिल्ह्यातील आंबा – काजू फळ पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून गेला महिनाभर शेतकरी आणि बागायतदार आक्रमक बनले असून शेतकरी संघटनेचे नेते माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करीत आहेत. दरम्यान आंब्याला हेक्टरी पाच लाख आणि काजूला हेक्टरी तीन लाख रुपये नुकसान भरपाई मिळावी अशी शेतकऱ्यांची आणि बागायतदारांची मागणी आहे. गेल्याच आठवड्यात जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांनी अचानकपणे मोर्चासमोर येऊन अधिवेशन काळात याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन दिले होते. उद्या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. सरकारचा निर्णय होवा अथवा न होवो आम्ही आमच्या मागण्यांवर ठाम असून २३ तारखेला 'चक्का जाम' आंदोलन होणारच असा निर्धार शेट्टी यांनी व्यक्त केला होता त्यानुसार सोमवारी सकाळी साडेदहा वाजता हे आंदोलन होणार आहे

## मुंबईला पुराचा धोका वाढला!

### १३० नवीन फ्लडिंग पॉइंट... ५६१ ठिकाणी पाणी तुंबण्याचा धोका



**१ हजार क्यूबीक मीटर ताशी पाणी उपसा**

पावसाळ्यात मुंबईत पाणी साचू नये, यासाठी मुंबई महापालिकेच्या हद्दीत आणि रेल्वे प्रशासनाच्या हद्दीत एकूण ५४७ पंप बसवण्यात येणार आहेत. ताशी ६० क्यूबीक मीटर ते १ हजार क्यूबीक मीटर क्षमतेचे पाणी उपसा करणारे पंप बसवण्यात येणार असल्याची माहिती पालिका प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

२६ जुलैची आठवण निघाली की आजही मुंबईकरांच्या काळजात धस्स होते. ती काळरात्र पुन्हा येऊ नये, अशीच प्रार्थना मुंबईकरांकडून दर पावसाळ्यात केली जाते. मात्र आता मुंबईत आजही ४३१ ठिकाणी फ्लडिंग पाईट असून त्यात १३० नवीन फ्लडिंग पॉइंटची भर पडली असून मुंबईत सद्यस्थितीत एकूण ५६१ फ्लडिंग पॉइंट आहेत. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात मुंबईकरांचा धोकादायक प्रवास कायम आहे.

**जुने फ्लडिंग पॉइंट**
- शहर - १३९
- पश्चिम उपनगर - १६१
- पूर्व उपनगर - १३१
- एकूण - ४३१

**नवीन फ्लडिंग पाईट**
- शहर - ३५
- पश्चिम उपनगर - ३०
- पूर्व उपनगर - ६५
- एकूण - १३०

यंदाच्या पावसाळ्यात मुंबईकरांची गैरसोय होऊ नये, यासाठी मुंबई महापालिकेने कंबर कसली आहे. पश्चिम उपनगरात सर्वाधिक १९१ फ्लडिंग पॉइंट असल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिलेल्या आकडेवारीतून समोर आली आहे. दरम्यान, पावसाळ्यात नवीन फ्लडिंग पॉइंट तयार होत असतात, परंतु मुंबईकरांची गैरसोय होऊ नये, यासाठी मुंबई महापालिका योग्य ती खबरदारी घेत असते. यंदाही मुंबईत ठिकठिकाणी पाणी उपसा करणारे पंप बसवण्यात येणार असल्याची माहिती पालिकेचे अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिली.

पुढील दोन ते अडीच महिन्यांनंतर वरुणराजाचे आगमन होणार आहे. मार्च महिन्याचा तिसरा आठवडा उजाडला तरी नालेसफाईच्या कामाला वेग आलेला नाही. तर मिठी नदीच्या सफाईसाठी कंत्राटदारच पुढे आलेले नाहीत. त्यातच मुंबईत ठिकठिकाणी फ्लडिंग पॉइंट्स असल्याने मुंबई जलमय होण्याचा धोका वाढला आहे. पावसाच्या पाण्याचा वेळीच निचरा व्हावा, यासाठी मुंबईत ठिकठिकाणी उच्च क्षमतेचे ५४७ पंप बसवण्यात येत आहे. मात्र रस्ता खचणे, इमारत अथवा इमारतीचा भाग कोसळणे झाडांच्या फांद्या कोसळणे, उघड्या मॅनहोलचा धोका कायम असताना ५६१ फ्लडिंग पॉइंटचा धोका यंदा कायम आहे.

## धाराशिवमध्ये लोककलेच्या नावावर वेश्या व्यवसाय

### 4 कला केंद्रांवर घडला प्रकार... 'असं' बाहेर आलं प्रकरण

**मैत्रिणीला सांगितले दुःख अन्...**

एका पीडित महिलेने दिलेल्या फियार्दीनुसार, ती विवाहित होती मात्र नवरा तिला दारू पिऊन मारहाण करीत होता. तिने तिच्या संसारातील त्रास तिची मैत्रीण सोनाली वाघ हिला सांगितला. त्यानंतर पतीच्या त्रासाला कंटाळून ती येडशी येथील पिंजरा कला केंद्रात आली. तिथे तिने तिची ओळख मालकीण असलेल्या कविता कोळपेकर हिच्याशी करून दिली. यानंतर मैत्रिणीने तिथे मॅनेजर असलेल्या सचिन चंद्रकांत कापसे याच्याशी ओळख करून दिली. तिथे सचिन कापसे हा ग्राहक आले की त्यांच्याशी बोलणी करुन ग्राहकांना मुली दाखवायचा व ग्राहक मुली पसंद करुन त्यांना वेश्यागमनासाठी कला केंद्र बाहेर घेऊन जायचे.

■धाराशिव। प्रतिनिधी,

धाराशिव जिल्ह्यातील 3 कला केंद्रावर एका विवाहित महिलेला कलेच्या नावाखाली वेश्या व्यवसाय करायला भाग पाडल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पीडितेने दिलेल्या तक्रारीवरून पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. फियार्दीनुसार तिला धाराशिव जिल्ह्यातील पिंजरा, महाकाली व साई कला केंद्र या 3; तर लातूर जिल्ह्यातील बुधडा कला केंद्रात बळजबरीने डांबून ठेवून मारहाण करण्यात आली. ग्राहकांसोबत पैशाच्या बदल्यात वेश्या व्यवसाय करायला भाग पाडले. कला केंद्राच्या नावाखाली चालणाऱ्या रॅकेटचा पदार्फाश या महिलेने केला आहे.

पीडित महिलेच्या तक्रारीनंतर पिटा कायदा व भारतीय न्याय संहिता कलम 115(2), 3(5), 351(3) व 64(2)(m) अन्वये पुणे ग्रामीण येथील वालचंदनगर पोलिस ठाण्यात गुन्हा करण्यात आला असुन तपासासाठी हे प्रकरण धाराशिव ग्रामीण पोलिसाकडे वर्ग करण्यात आले आहे. या प्रकरणी पुणे वाघोली येथील सोनाली वाघ, लातुर येथील सचिन चंद्रकांत कापसे, सोनाली चंद्रकांत कापसे, अजय कापसे, माधुरी गिरी, अनिता कापसे व कविता कोळपेकर, बीड परळी येथील माधुरी गिरी व धाराशिव येथील अंजली अशा 9 संशयित आरोपी विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला.



जेव्हा पीडित महिलेला हा प्रकार समजला तेव्हा तिने कला केंद्राबाहेर जाणेसाठी हट्ट केला असता तेथील मालकिण कविता कोळपेकर हिने मारहाण करुन डांबून ठेवले. मारहाण केल्यानंतर तिला एका ग्राहकासोबत सचिन हा येडशी येथील एका लॉजवर घेऊन गेला व तिथे अनैतिक संबंध ठेवले. लग्नाचे आमिष देऊन सचिन याने संबंध ठेवले. त्यानंतर त्याची सख्खी बहीण सोनाली चंद्रकांत कापसे हिच्याकडे साईनगर, लातूर येथे घेऊन गेला.

**दुसरे कला केंद्र काढले तिथेही वेश्या व्यवसाय**

सोनाली कापसे अगोदर पिंजरा कला केंद्र येथे होती. साईनगर येथे पीडितेला काही दिवस ठेवल्यानंतर तिथे मारहाण करायला सुरुवात झाली. त्यांनी मिळून पीडितेला बुधडा कला केंद्र (औसा रोड, लातूर) येथे रेखा जाधव या मालकिणीकडे 30 हजार रुपये घेऊन कामाला ठेवले, तिथेही तिला वेश्या व्यवसाय करायला भाग पाडले. सोनाली कापसे व अनिता कापसे हे पीडित महिलेला महाकाली कला केंद्र येरमाळा येथे घेऊन गेले. तिथे माधुरी गिरी या मालकिणीकडे या तिघी राहिल्या. तिथेही मालकिण माधुरी गिरी ग्राहकांकडून पैसे घेऊन वेश्या व्यवसाय करवून घेत होती. साई कला केंद्र नावाची पार्टी सोनाली कापसे हिने काढली. तिथेही वेश्या व्यवसाय करायला भाग पाडले.

**अटकपूर्व जामीनासाठी अर्ज**

गुन्ह्यात अटक टाळण्यासाठी काही आरोपींनी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. सुनावणी दरम्यान अ‍ॅड. अमोल वरुडकर यांनी बाजू मांडली. सदर तक्रार ही आकसापोटी करण्यात आली असून, आरोपीचा यातील सहभाग तपासात अद्याप स्पष्ट झालेला नाही. आरोपी तपासाला पूर्ण सहकार्य करण्यास तयार असून, त्याची कोणतीही रिकव्हरी बाकी नसल्याने पोलिस कोठडीत ठेवण्याची गरज नाही, असा युक्तिवाद करण्यात आला. संशयित आरोपी कविताच्या वतीने वकिलांनी केलेला युक्तिवाद गाह्य धरून जामीन मंजुर करण्यात आला. अ‍ॅड. वैभव खांडेकर, अ‍ॅड. बालाजी पोतदार, अ‍ॅड. सचिन जाधव, अ‍ॅड. जनक साळुंखे, अ‍ॅड. विक्रम माने, अ‍ॅड. दीपक तुपसुंदरे यांनी काम पाहिले.

धाराशिव जिल्ह्यातील कला केंद्र वादाच्या भोवऱ्यात सापडलेली असतानाच हे प्रकरण समोर आले आहे. महाकाली हे एकमेव कला केंद्र सोडले; तर इतर 4 केंद्राचा परवाना जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी पोलिस अधीक्षक रितु खोखर यांच्या अहवालानंतर कायमस्वरूपी बंद केला आहे. पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांनी चुकीचे प्रकार करणाऱ्या कला केंद्रावर कारवाईचे निर्देश दिले होते. या प्रकरणात उच्च स्तरीय चौकशीची मागणी होत आहे. या प्रकरणात कला केंद्रवरील आणखी कोणी सहभागी आहेत का ? इतर कोणावर अत्याचार झाला आहे का ? यांचा तपास पोलिस करीत आहेत.

## गोव्यात नगरसेवकाच्या 22 वर्षीय मुलाने 25 ते 30 अल्पवयीन मुलींवर केले अत्याचार

■कणकवली। प्रतिनिधी,

दक्षिण गोव्यात गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेल्या एका अत्यंत धक्कादायक लैंगिक अत्याचार प्रकरणातील संशयित सोहम नाईक याला पोलिसांनी रविवारी रात्री अटक केली आहे. 22 वर्षीय सोहम नाईक याने तब्बल 25 ते 30 अल्पवयीन मुलींशी लैंगिक संबंध ठेवल्याचा आणि त्यांचे व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी दिल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर गोव्यामध्ये मोठी खळबळ उडाली असून संशयित सोहम हा कुडचडे पालिकेतील एका स्थानिक नगरसेवकाचा मुलगा असल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा छडा लावून अखेर त्याला बेड्या ठोकल्या असून सध्या या संपूर्ण प्रकरणाचा तपास सुरू आहे.

**मद्यपानाच्या पार्टीत झाला अघोरी कृत्यांचा पदार्फाश**

सोहम नाईक याने गेल्या



3 वर्षात किमान 25 ते 30 अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण केल्याचे तपासात समोर आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे हे संपूर्ण प्रकरण एका मद्यपानाच्या पाटीर्मुळे उघडकीस आले. गेल्या आठवड्यात एका पार्टीदरम्यान आरोपी सोहम याने आपल्या मित्रांना काही अश्लील व्हिडिओ दाखवले होते, ज्यावरून या संपूर्ण सेक्स स्कँडलचा गौप्यस्फोट झाला. त्याने पीडित मुलींना त्यांचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देऊन हे कृत्य केल्याचा आरोप आहे. Madegal-Cacora येथील रहिवासी असलेल्या या तरुणाने अनेक मुलींना आपल्या जाळ्यात ओढले असून या प्रकरणाची चर्चा सध्या संपूर्ण गोव्यात सुरू आहे.

**राजकीय संबंध आणि पोलिसांसमोर तक्रारींचे आव्हान**

संशयित सोहम नाईक हा स्थानिक भाजप नगरसेवकाचा मुलगा असल्याने या प्रकरणाला राजकीय वळण मिळाले असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. रविवारी रात्री आरोपीला अटक करण्यात आली तेव्हा मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक कुडचडे पोलीस ठाण्यात जमा झाले होते. या प्रकरणात अद्याप कोणतीही अधिकृत तक्रार दाखल झालेली नाही, कारण अनेक पालकांनी सामाजिक प्रतिष्ठा आणि भीतीपोटी पुढे येण्यास असमर्थता दर्शवली आहे. मात्र पोलिसांनी या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन आरोपीला ताब्यात घेतले असून त्याचे कृत्य समाजासाठी घातक असल्याचे म्हटले आहे. आरोपीच्या मोबाईलमधील व्हिडिओ आणि इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे पोलीस आता पुढील कारवाई करत आहेत. दक्षिण गोवा पोलीस सध्या या प्रकरणाचा सखोल तपास करत असून आरोपीला कोठडीत घेण्यात आले आहे. पीडित मुलींचे वय आणि प्रकरणाची संवेदनशीलता पाहता पोलिसांनी अत्यंत सावधगिरीने पावले उचलली आहेत. या घटनेमुळे दक्षिण गोव्यातील पालकांमध्ये भीतीचे वातावरण असून अशा नराधमावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण करून त्यांना ब्लॅकमेल करण्याचा हा प्रकार समोर आल्याने गोव्यात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी नागरिकांना शांततेचे आवाहन केले असून पीडित कुटुंबांना न्याय मिळवून देण्यासाठी तपास यंत्रणा सक्रिय झाल्या आहेत.

## यवतमाळ हादरलं! दीड ग्रॅम सोन्याच्या नथीसाठी चिमुकलीचा बळी

### शेजारच्या घरातच पोत्यात सापडला मृतदेह

■मुंबई। प्रतिनिधी,

यवतमाळमधून एक हदय पिळवटणारी बातमी समोर आली आहे. लालसेपोटी एका लहानग्या जीवाचा बळी गेल्याची घटना घडली आहे. दारव्हा तालुक्यातील बोथ इथल्या सात वर्षीय बेपत्ता मुलीचा मृतदेह पोत्यात गुंडाळलेल्या अवस्थेत तिच्याच शेजारच्या घरात आढळला आहे. दीड ग्रॅम सोन्याची नथ चोरण्यासाठी व दोन कुटुंबातील जुन्या वादामुळे चिमुकलीचा हा खून झाल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. काय आहे संपूर्ण घटना जाणून घेऊया.

**शेजारच्या घरात पोत्यामध्ये सापडला मृतदेह**

घराच्या अंगणात खेळत असलेली सात वर्षीय शिवानी अचानक बेपत्ता झाली होती, संपूर्ण गावात शोध घेऊनही ती सापडत नव्हती. त्यामुळे कुटुंबियांनी याबाबत दारव्हा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनीही शिवानीचा शोध सुरू केला. आसपासचे गाव, शिवारात शोध घेतला गेला. मात्र, मुलीचा कोणताही थांगपत्ता मिळत नसल्याने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी गावातच तिचा शोध घेण्याचे ठरवले. तसेच शिवानीची माहिती देणाऱ्यास 25 हजार रुपयांचे बक्षिस पोलिसांनी जाहीर केले. दरम्यान संशयावरून शेजारच्या घरात झडती घेतली असता एका पोत्यात शिवानीचा मृतदेहच आढळला.

**दीड ग्रॅम सोन्याच्या नथीसाठी चिमुकलीचा खून**

त्यामुळे दोन कुटुंबात सलोखा नव्हता. त्यात घराबाहेर खेळत असलेल्या शिवानीच्या नाकातील दीड ग्रॅम सोन्याची नथ चोरण्याच्या उद्देशाने तिला तोंड दाबून घरात नेण्यात आले. आणि तिचा खून करण्यात आला. पोलिसांनी या प्रकरणी कैलास, माला, सोनी आणि रंजना जाधवसह एका विधी संघर्ष मुलाला अटक केली आहे. तसेच आरोपींवर कडक कारवाई करण्याची मागणी कुटुंबियांकडून करण्यात येत आहे.




या संताप जनक घटनेमुळे गावात खळबळ उडाली आहे. शेजारच्यांमधील वाद विकोपाला जाऊन निर्दयीपणे चिमुकल्या शिवानीचा जीव घेतल्या गेल्याने परिसरात हळहळ देखील व्यक्त होत आहे.

**अहिल्यानगरमधील थरार**

दरम्यान, अहिल्यानगरमधून देखील काहीदिवसांपूर्वी एक धक्कादायक बाब समोर आली. संगमनेर तालुक्यात सहावीतल्या मुलीला शाळेनंतर घरी जाताना पत्ता विचारण्याच्या बहाण्याने थांबवून तिच्यावर अ‍ॅसिड टाकण्यात आलं. यावेळी नागरिकांनी जखमी मुलीला डॉक्टर जम्बुकर हॉस्पिटल वडगाव पान येथे प्रथम उपचारासाठी दाखल केले नंतर लोणी इथल्या रुग्णालयात दाखल करून तिच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेमागचे कारण अद्याप समोर आलेले नाही. मात्र, यासर्व घटनांमुळे आता माणुसकी संपत चालली असून फक्त विकृती वाढत चालली आहे असे स्पष्ट चित्र उभे राहीले आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# महाराष्ट्रातले आसाराम



**हल्ली अशा प्रकरणांचा एक ठरावीक घटनाक्रम महाराष्ट्राच्या सवयीचा बनू पाहात आहे. एखाद्या नेत्याच्या निकटवतीर्यावर गंभीर आरोप होताच संबंधित नेता आणि त्याच्या वरिष्ठांकडून शक्यतो मौन बाळगले जाते.**

असहाय, असुरक्षित महिलांना भीती दाखवून आणि त्यांच्या श्रद्धांचा गैरफायदा घेऊन त्यांचे लैंगिक शोषण करणाऱ्या अशोक खरात याला खरे तर आसाराम किंवा रामरहीम यांचा महाराष्ट्रातील उत्तराधिकारी म्हणूनच गौरवले पाहिजे. महिलांवरील अत्याचार, काहीशे कोटी रुपयांची माया, हडपलेल्या जमिनी आणि बड्या धेंडांकडून मिळवलेले गुरुस्थान, असे नवनवे कारनामे समोर आल्याने'पुरोगामी' म्हणून स्वतःलाच गौरवणाऱ्या महाराष्ट्राची मान क्रमाक्रमाने खाली जात आहे. त्याच्या ट्रस्टच्या सदस्य आणि राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्या पदावर हे प्रकरण बेतले असून, या बाबासोबतचे सर्वच पक्षांतील नेते-सरकारी अधिकाऱ्यांची छायाचित्रे-व्हिडिओ पाहता हे प्रकरण आणखी कोणाकोणावर शेकणार, हा प्रश्न पडतो. त्याच्या गैरकृत्यांचे शंभर व्हिडीओ कर्नाटकातील प्रज्वल रेवण्णा प्रकरणाची आठवण करून देतात; तर महिलांचे लैंगिक शोषण थेट एपस्टीन फाइल्स प्रकरणाला साजेसे आहे. 'आपण त्याला ओळखत नाही,' किंवा 'त्याच्या गुन्ह्यांशी आपला संबंध नाही,' असे सांगून कानावर हात ठेवण्याचा प्रयत्न; उलटपक्षी 'कडक कारवाई करा,' 'कोणालाही पाठीशी घालणार नाही,' असा कांगावा केला जातो. त्याचा उपयोग होत नाही, असे लक्षात आल्यावर राजीनामा देऊन प्रकरण शांत करण्याचा प्रयत्न होतो. रूपाली चाकणकर यांच्या बाबतीत तेच घडले. अनेक वर्ष खरातच्या संस्थेच्या सदस्य असताना आणि त्याची पाद्यपूजा किंवा त्याच्यासाठी छत्री धरतानाची छायाचित्रे सार्वजनिक होत असूनही 'त्याला ओळखतच नाही,' असा पवित्रा त्यांनी घेतला. त्यांच्या पक्षाचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी प्रथम त्यांच्या अप्रत्यक्ष पाठराखणीचा प्रयत्न केला; तर दुसरे नेते सुनील तटकरे पत्रकारांवरच संतापले. यापूर्वी वैष्णवी हगवणे आणि संपदा मुंडे अशा प्रकरणांतही चाकणकर यांच्यावर आरोप झाले होते. अन्याय-अत्याचारपीडित महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी मिळालेली खुर्ची मिरवणारेच कर्तव्य खुंटीला टांगून अशा गुन्हेगारांच्या जाहीर पाद्यपूजेत धन्यता मानत असतील, तर पीडित महिलांनी न्यायाची अपेक्षा कशी करावी? भरीस भर म्हणून राजीनामा दिल्यानंतर, 'मी वारकरी संप्रदायातील आहे,' असे सांगण्याचा मानभावीपणाही त्यांनी केला; 'ऐसे कैसे जाले भोंदू,' या संत तुकाराम महाराजांच्या रचनेतील 'तुका म्हणे सांगो किती, जळो तयांची संगती' हे वचन त्या विसरल्या असल्या, तरी समस्त महाराष्ट्राला चांगलेच ठाऊक आहे. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी विशेष तपास पथक स्थापन केले आहे. कॅप्टन खरातने नाशिक व आसपासच्या परिसरात एकरा-एकरांनी जमिनी कशा खरेदी केल्या, त्याच्या विरोधातील तक्रारदारांवर कोणाच्या दबावामुळे गुन्हे दाखल झाले; इतकेच नव्हे तर काही दिवसांपूर्वी त्याच्यावर होऊ शकणारी कारवाई रोखण्यासाठी कोणत्या माननीयांनी दबाव आणला, अशा अनेक प्रश्नांची उत्तरे तपासातून जनतेला कळावीत, ही अपेक्षा. बाबाच्या गुन्ह्यांत चाकणकर यांचा सहभाग आहे की नाही, हे तपासात समोर येईलच; पण गुन्ह्यांची भीषणता पाहिली, तर केवळ अशा नराधमाला समाजात प्रतिष्ठा मिळवून दिली, त्याबद्दल त्यांना किंवा बाबाच्या कच्छपी लागलेल्या सर्व नेत्यांना होणारी कोणतीही शिक्षाच कमीच होईल. या प्रकरणाला आपण वाचा फोडली, असा बडेजाव कोणीही मारू नये; कारण कार्यालयातील सहायकामार्फत हे उघडकीस आले नसते, तर आणखी किती काळ हे प्रकार सुरू राहिले असते, आणखी किती महिला त्यास बळी पडल्या असत्या आणि आणखी किती बडी धेंडे 'आम्हाला माहितीच नव्हते,' असे सांगून अशा बाबा-बुवांची पत समाजात वाढवत राहिली असती, याची कल्पनाच केलेली बरी. सध्या देशभरात उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत अशा बाबा-बुवांचे पेव फुटले आहे. संतांची आणि सुधारकांची भूमी असणाऱ्या महाराष्ट्रात त्याची लागण अनथार्ला निमंत्रण ठरेल. नागरिक बाबा-बुवांकडे गर्दी करतात, म्हणून नेते त्यांच्या दरबारात जातात आणि नेते त्यांच्या चरणी लीन झाल्याने आणखी नागरिक गर्दी करतात. मग काही बाबा एखाद्या पक्षाचे उमेदवार ठरवतात, एखाद्या बाबाला नेमकी निवडणूक आल्यावर 'पॅरोल' मिळतो आणि आपल्या बड्या शिष्यांकरवी हे बुवा संपत्तीत भर घालतात आणि प्रशासनातही ढवळाढवळ करतात, असे हे दुष्टचक्र आहे. सगळेच बाबा-बुवा चुकीचे मार्गदर्शन करत नसले तरी त्यांच्याकडे आपली बुद्धी गहाण ठेवणे, ही या शोषणाची सुरुवात आहे, याची खूणगाठ बांधलेली बरी.

# चौकशीचा केवळ दिखावा ठरू नये



कॅप्टन अशोक खरात प्रकरणाने अंधश्रद्धा, सत्तेशी संगनमत आणि पैशाच्या जोरावर उभी राहिलेली भोंदू बाबांची समांतर व्यवस्था ही साखळी पुन्हा एकदा पुढे आली आहे. वेळोवेळी असे ह्यअंधश्रद्धेचे कॅप्टनह्व पुढे येतात आणि त्यातून 'शोषणाचे पॅटर्न'ही सातत्याने अधोरेखित होतात. मात्र अशा घटना उघडकीस आल्यानंतर काही दिवस चर्चा रंगते आणि नंतर सगळं पूर्ववत होतं. त्यामुळे खरातवर ठोस कारवाई झाली पाहिजे. अन्यथा, हा सगळा उपक्रम केवळ दिखावा ठरेल.

कॅप्टन अशोक खरातच्या निमित्ताने पुन्हा एकदा महाराष्ट्रातील आणि देशभरातील भोंदू बुवाबाबांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. हे प्रकरण नवीन नाही. दर काही वर्षांनी एखादा स्फोट होतो, काही व्हिडिओ बाहेर येतात, जनतेत संताप उसळतो आणि नंतर सगळं पुन्हा शांत होतं. या शांततेच्या आड चालणारा काळाबाजार, अंधश्रद्धेचा व्यवसाय आणि राजकीय संरक्षणाचा खेळ मात्र अखंड सुरूच असतो. लोकांच्या भीतीवर, श्रद्धेवर आणि अडचणींवर असे भोंदू आपली सत्ता उभी करतात. जसं अध्यात्माच्या नावाखाली आसाराम बापूनं मोठं साम्राज्य उभारलं, पण नंतर त्यांच्या विरोधात लैंगिक अत्याचाराचे गंभीर आरोप सिद्ध झाले. त्याचप्रमाणे गुरमीत राम रहीम सिंह याने धर्म, सेवा आणि समाजकार्य यांचा आव आणत लाखो अनुयायी गोळा केले. शेवटी बलात्कार आणि खून प्रकरणात शिक्षा झाली. नित्यानंद यांच्याबाबतही अशाच प्रकारचे आरोप समोर आले आणि त्यांनी तर स्वतःचं स्वतंत्र 'देश' जाहीर करण्यापर्यंत मजल मारली.

महाराष्ट्रातही अशा बाबांची कमतरता नाही. भैय्यू महाराज यांचं उदाहरण घ्यायला हरकत नाही. समाजकार्य, राजकीय संबंध आणि अध्यात्म यांचा संगम करून त्यांनी मोठा प्रभाव निर्माण केला होता. जरी त्यांच्या बाबतीत गुन्हेगारी आरोप सिद्ध झाले नसले तरी त्यांच्या आयुष्यातील गूढता आणि आर्थिक व्यवहारांवर प्रश्न उपस्थित झाले. तसेच अनेक स्थानिक स्तरावरील बुवा, जसे की गावोगावी 'जादूटोणा करणारे' किंवा 'भूत काढणारे' लोक, अजूनही मोठ्या प्रमाणावर लोकांना फसवत आहेत. या सगळ्या प्रकरणात सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे राजाश्रय. भोंदू बाबांना राजकारण्यांचा पाठिंबा मिळाल्याशिवाय ते इतक्या मोठ्या प्रमाणावर वाढू शकत नाहीत. चंद्रास्वामी हे याचं ठळक उदाहरण आहे.

चंद्रास्वामी यांचं नाव एकेकाळी देशातील मोठ्या राजकीय नेत्यांशी जोडलेलं होतं. त्यांचे संबंध पी. व्ही. नरसिंह राव यांच्यापर्यंत पोहोचले होते. चंद्रास्वामीवर परदेशी चलन व्यवहार, फसवणूक आणि शस्त्रसौद्यांशी संबंधित आरोप झाले. एवढ्या गंभीर आरोपांनंतरही त्यांच्यावर ठोस कारवाई होण्यासाठी खूप वेळ लागला. अशा बाबांचं एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे ते नेहमी एखादं भव्य समाजोपयोगी काम पुढे ठेवतात. कुणी शाळा उघडतो, कुणी रुग्णालय चालवतो, कुणी अन्नछत्र चालवतो. पण या सगळ्या 'सेवा' उपक्रमांच्या आडून काळा पैसा पांढरा करण्याचा, जमीन बळकावण्याचा आणि लोकांवर प्रभाव निर्माण करण्याचा खेळ चालतो. लोकांना वाटतं की हा बाबा समाजासाठी काम करतो, त्यामुळे त्याच्यावर प्रश्न उपस्थित करणं म्हणजे धर्मद्रोह. ही मानसिकता अत्यंत धोकादायक आहे. अनेकदा अशा बाबांच्या नावावर संपत्ती नसते. ती त्यांच्या नातेवाईकांच्या, ट्रस्टच्या किंवा विश्वासू लोकांच्या नावावर असते. त्यामुळे कायद्याच्या कचाट्यातून ते सहज सुटतात. महागड्या गाड्या, जसे की मर्सिडीज किंवा बीएमडब्ल्यू, या त्यांच्याकडे असतात, पण त्या 'भेट' म्हणून दाखवल्या जातात. त्यामुळे त्या त्यांच्या अधिकृत मालमत्तेत दाखवल्या जात नाहीत.

भोंदू बाबांच्या साखळीत 'बाई' हा घटक जाणीवपूर्वक लक्ष्य केलेला असतो. या व्यवस्थेत महिलांचे शोषण हे योजनाबद्ध असते. श्रद्धा, भीती, सामाजिक दबाव आणि वैयक्तिक अडचणी यांचा संगम घडवून महिलांना अशा जाळ्यात ओढले जाते. अनेक महिलांच्या आयुष्यात काही ना काही पोकळी असते. कौटुंबिक तणाव, पतीसोबतचे मतभेद, मूलबाळ नसणे, आर्थिक अडचणी किंवा मानसिक तणाव. अशा वेळी एखादा बाबा 'उपाय' देतो. सुरुवातीला तो सहानुभूती दाखवतो, समस्या शांतपणे ऐकतो आणि विश्वास निर्माण करतो. मानसशास्त्रात याला 'ग्रोमिंग' म्हणतात. म्हणजे हळूहळू एखाद्या व्यक्तीचा विश्वास जिंकून तिला आपल्या नियंत्रणाखाली आणणे. या टप्प्यावर महिला त्या बाबाला 'देवमाणूस' समजू लागते. तिच्यासाठी तो केवळ मार्गदर्शक नसतो, तर तिच्या आयुष्याचा केंद्रबिंदू बनतो. यानंतर सुरू होतो प्रभाव वाढवण्याचा खेळ. 'तुझ्यावर वाईट शक्ती आहे', 'तुझ्या घरात दोष आहे', 'तुझ्या कुंडलीत अडथळे आहेत'. अशा भीती निर्माण करणाया गोष्टी सांगितल्या जातात. भीती ही माणसाला नियंत्रित करण्यासाठी सर्वात प्रभावी साधन आहे.

जेव्हा एखादी व्यक्ती घाबरलेली असते, तेव्हा ती तर्कशुद्ध विचार कमी करते आणि उपाय शोधण्यासाठी कोणत्याही गोष्टीला तयार होते. बाबा हाच उपाय देतो. पण त्या उपायांची किंमत असते. कधी पैशात, कधी शरीरात. 'दीक्षा' किंवा 'उपचार' या नावाखाली जे घडतं, ते अनेकदा लैंगिक शोषणाचं स्वरूप घेतं. हे सरळसरळ जबरदस्तीने होत नाही; ते मानसिक दबावातून घडवलं जातं. 'हे गुप्त विधी आहेत', 'हे केल्याशिवाय तुझं कल्याण होणार नाही', 'ही देवाची आज्ञा आहे'. अशा शब्दांत महिलांना पटवलं जातं. अनेक वेळा महिलांना असं वाटायला लावलं जातं की त्या काहीतरी पवित्र करत आहेत. प्रत्यक्षात मात्र त्यांचा गैरफायदा घेतला जात असतो. या प्रकरणात पीडित महिलांनी अनेक वर्षे गप्प राहण्याचं कारण म्हणजे भीती आणि त्या व्यक्तीचा प्रचंड प्रभाव. अशावेळी महिलांना काहीतरी चुकीचं घडतंय याची जाणीव असते, पण दुसरीकडे त्या बाबावरचा विश्वास आणि भीती त्यांना बोलू देत नाही. भारतीय समाजात महिलांवर आधीच अनेक बंधने असतात. जर एखाद्या महिलेनं पुढे येऊन आरोप केले, तर तिच्या चारित्र्यावर प्रश्न उपस्थित होतात. 'ती तिथे का गेली?', 'तिनं आधी का सांगितलं नाही?' असे प्रश्न विचारले जातात. त्यामुळे अनेक महिला गप्प राहणंच पसंत करतात. हीच गोष्ट भोंदू बाबांसाठी फायदेशीर ठरते. त्यांना माहीत असतं की त्यांच्याविरोधात बोलणं महिलांसाठी सोपं नाही.

काही प्रकरणांमध्ये महिलांना ब्लॅकमेलही केलं जातं. 'तुझा व्हिडिओ आहे', 'तुझं रहस्य बाहेर काढू' अशा धमक्या दिल्या जातात. त्यामुळे त्या आणखी खोल जाळ्यात अडकतात. काही वेळा या महिलांना इतर महिलांना आणण्यासाठी वापरलं जातं. एक प्रकारची साखळी तयार केली जाते, ज्यात पीडितच पुढे जाऊन इतरांना अडकवते. अर्थात बाबाचे 'कारनामे' एकट्याचे नसतात, ते संघटित स्वरूपाचे असतात. आश्रम, ट्रस्ट, सेवक, व्यवस्थापक या बाबी एका यंत्रणेसारख्या काम करतात. महिलांना कधी 'सेविका' म्हणून ठेवले जाते, पण प्रत्यक्षात त्यांच्यावर नियंत्रण ठेवले जाते. त्यांचा बाहेरील जगाशी संपर्क कमी केला जातो, जेणेकरून त्या पूर्णपणे त्या बाबाच्या प्रभावाखाली राहतील. काही वेळा पीडित महिलांवर तक्रार मागे घेण्यासाठी दबाव टाकला जातो.

राजकारणी आणि भोंदू बाबा यांचं नातं सत्तेच्या आणि पैशाच्या गरजेतून घडलेलं एक परस्परावलंबी समीकरण आहे. इथे श्रद्धा ही केवळ बाह्य आवरण असते; आतून हा व्यवहार सत्ता टिकवण्याचा आणि वाढवण्याचा असतो. एका बाजूला राजकारण्याला मतांची गरज असते, तर दुसऱ्या बाजूला बाबाला संरक्षण, प्रसिद्धी आणि पैशाची. या दोघांच्या गरजा जिथे जुळतात, तिथेच हा धोकादायक संगम तयार होतो. राजकारणात अनिश्चितता मोठी असते. निवडणुकीचा निकाल, जनतेचा मूड, अंतर्गत गटबाजी या सगळ्या गोष्टींमुळे अनेक नेते मानसिकदृष्ट्या अस्थिर होतात. अशा वेळी 'कोणीतरी भविष्य सांगणारा' किंवा 'संकट टाळण्याचा उपाय देणारा' बाबा त्यांना आधार वाटू लागतो. सुरुवात बहुतेक वेळा साध्या सल्ल्यापासून होते. एखादा दिवस शुभ आहे, एखाद्या रंगाचा वापर करा, एखादी पूजा करा. योगायोगाने एखादी गोष्ट जुळून आली, की त्या नेत्याचा विश्वास दृढ होतो. याच टप्प्यावर बाबा त्या राजकारण्याच्या आयुष्यात खोलवर शिरतो. तो केवळ सल्लागार राहत नाही, तर निर्णय घेणारा बनतो.

कोणत्या दिवशी उमेदवारी जाहीर करायची, कोणाशी युती करायची, कोणत्या ठिकाणी सभा घ्यायची अशा गोष्टींवरही त्याचा प्रभाव पडू लागतो. अनेक नेत्यांकडे बेहिशोबी संपत्ती असते. ज्याला आपण सरळ भाषेत काळा पैसा म्हणतो. हा पैसा थेट वापरणं धोकादायक असतं. त्यावर प्रश्न उपस्थित होऊ शकतात. पण 'पूजा', 'यज्ञ', 'दान' या नावाखाली तो सहजपणे खर्च करता येतो. कोट्यवधींचे यज्ञ, मोठमोठे धार्मिक कार्यक्रम हे सगळं पाहता बाहेरून ते धर्मकार्य वाटतं, पण प्रत्यक्षात तो काळा पैसा पांढरा करण्याचा एक मार्ग असतो. पण या सगळ्यात सर्वात मोठं सत्य हे आहे की पैसा जिथे असतो तिथेच बाबा दिसतो. गोरगरीबाच्या झोपडीत असा बाबा कधीच जाणार नाही. तिथे ना पैसा असतो, ना प्रभाव. भोंदू बाबांचा व्यवसाय हा 'भक्ती'वर नाही, तर 'भांडवला'वर चालतो.

या सगळ्या व्यवस्थेत राजकीय नेते अनेकदा स्वतःलाच फसवून घेतात. सुरुवातीला ते बाबाचा उपयोग करतात असं त्यांना वाटतं. मतं मिळवण्यासाठी, जनाधार वाढवण्यासाठी. पण हळूहळू परिस्थिती उलट होते. बाबा त्यांच्या निर्णयांवर प्रभाव टाकू लागतो, त्यांच्या आयुष्यात हस्तक्षेप करू लागतो आणि एक वेळ अशी येते की तो राजकारणी त्या बाबाचा ह्यभक्तह्व बनतो, स्वायत्त नेता राहत नाही. कॅप्टन अशोककुमार खरात याची संपत्ती कोणी 200 कोटी म्हणतं, तर कोणी ८00 कोटी. नेमका आकडा काहीही असो, मूलभूत प्रश्न टळत नाही. इतक्या मोठ्या प्रमाणावर मालमत्ता जमा होत असताना सरकारी यंत्रणा नेमकी काय करत होती?

आपल्याकडे मालमत्ता खरेदी-विक्री, आर्थिक व्यवहार आणि उत्पन्न यावर लक्ष ठेवण्यासाठी अनेक संस्था आहेत. इन्कमटॅक्स विभाग, सहनिबंधक कार्यालयं, बँकिंग प्रणाली. या सगळ्या एकमेकांशी जोडलेल्या आहेत. व्यवहारांची नोंद होते, दस्तऐवज तयार होतात, स्टॅम्प ड्युटी भरली जाते. म्हणजेच, एखाद्या व्यक्तीकडे अचानक कोट्यवधींची मालमत्ता जमा होणं हे पूर्णपणे 'अदृश्य' राहणं शक्य नाही. तरीही अशी प्रकरणं वर्षानुवर्षे नजरेआड राहतात. कारण या यंत्रणा अशा बाबांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात. त्यांच्यावर राजकीय वा आर्थिक दबाव असू शकतो. म्हणूनच, केवळ एका प्रकरणावर चर्चा करून उपयोग नाही. अशोककुमार खरात हे निमित्त असू शकतं, पण प्रश्न खूप मोठा आहे. राज्यात आणि देशभरात अशा अनेक भोंदू बाबांकडे प्रचंड संपत्ती आहे. त्यांनी आजवर अनेकांचे शोषण केलेले असू शकते. अशा बाबांची व्यवस्थित चौकशी झाली, तर अनेक धक्कादायक गोष्टी समोर येऊ शकतात. तक्रारदारांची ओळख लपविल्यास गृहमंत्रालयाच्या हातात अशा बाबांची आणि त्यांच्या संपत्तीची मोठी यादीच तयार होईल. पण केवळ यादी तयार करूनही उपयोग नाही. त्यावर ठोस कारवाई झाली पाहिजे. जुन्या प्रकरणांच्या फाईल्स पुन्हा उघडल्या पाहिजेत. ज्या प्रकरणांमध्ये पुरावे दाबले गेले, साक्षीदारांना धमकावलं गेलं, ती सगळी प्रकरणं नव्याने तपासली गेली पाहिजेत. अन्यथा, हा सगळा उपक्रम केवळ दिखावा ठरेल.

महाराष्ट्रात भोंदू बाबांना यापूर्वी व आता सरकारी मान्यता मिळाल्याने अशोक खरात सारखी प्रकरण बाहेर येत आहेत. यामध्ये अनेक राजकीय नेत्यांचे फोटो या अशोक खरात बरोबर असल्याने त्याला राजकीय वळण मिळाले आहे.

महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. विशेष म्हणजे अंधश्रद्धा निर्मूलन कायदा महाराष्ट्रात अमलात आणला आहे. परंतु त्याचा फारसा उपयोग होत नसल्याचे अनिंसने म्हटले आहे. मुख्यतः एका पीडित महिलेने हा खटला दाखल केल्याने खरातचे प्रकरण बाहेर आले. त्याने या भोंदूगिरीतून कोट्यवधी रुपयाची मालमत्ता जमा केली, असे सोशल मीडियावरील वृत्तात नमूद केले आहे. कोणी खरातची मालमत्ता ५०० कोटींची तर कुणी एकूण पाच हजार कोटीची असल्याचे म्हटले आहे. किती कोटींची इस्टेट हा प्रश्न इथे गौण आहे. मुख्यतः राजकीय नेत्यांचा संबंध आल्याने हे प्रकरण चिघळेल आहे. महाराष्ट्र महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्यामुळे प्रकरणाची तीव्रता वाढली आहे. मुख्यमंत्र्यांनी याबाबत अत्यंत कडक भूमिका घेतल्याने चाकणकर यांना राजीनामा द्यावा लागला. चाकणकर यांनी जे स्पष्टीकरण दिले आहे तेही महत्वाचे आहे. अशोक खरात व त्यांची पत्न ी हे त्यांचे गुरु आहेत आणि गुरुची पाद्यपूजा करणे हे परंपरेने चालत आले आहे. मात्र अनेक राजकीय नेत्यांचे खरातसोबतचे फोटो जाहीर झाल्यामुळे विविध राजकीय पक्षांनी प्रकरणाला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न केला आहे. उबाठा शिवसेनेच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी राजकीय नेत्यांच्या खरात सोबतच्या फोटो सेशनवर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. परंतु त्यांना माहित नाही की, त्यांच्याच पक्षाच्या एका आमदाराचा फोटो खरातबरोबर आहे. एवढेच कशाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आ. जयंत पाटील व भाजपाचे मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह अनेक नेत्यांचे फोटो खरात बरोबर असल्याचे प्रसिद्ध झाले. कुठलाही नेता मोठा होतो तेव्हा लोक व नागरिक त्याच्यासमवेत जाऊन फोटो काढतात. याचा अर्थ त्यांचा घनिष्ठ संबंध आहे हे म्हणणे योग्य नाही. ज्या पीडित महिलेने तक्रार दाखल केली आहे त्यामागे काही बनाव आहे का? याचा तपास देखील एसआयटी करीत आहे. अनेक राजकीय नेते या खरातशी खरोखर संबंधित आहेत की नाही त्याची छाननी होणे आवश्यक आहे. एखाद्या नेत्याचा केवळ फोटो या भोंदू बाबांबरोबर आला म्हणून त्यांचा संबंध त्यांच्याशी जोडणे योग्य नाही.



# अशोक खरात प्रकरणाने राजकीय खळबळ!

भोंदूबाबा कोट्यवधी रुपयाची इस्टेट जमा करतात. राजकीय पाठबळ असल्याशिवाय हे कृत्य होऊ शकत नाही. हे जरी सत्य असले तरी त्यामागची कारणे शोधली पाहिजेत. अशा प्रकरणाला पायबंद घातला नाही तर पुढच्या काळात वाईट स्थिती निर्माण होईल.

खरात ही व्यक्ती भोंदू बाबाचे काम करत होती तर राज्य सरकारच्या पोलीस खात्याला याची माहिती असणे आवश्यक होते. परंतु जेव्हा राजकीय संबंध येतात तेव्हा पोलीस खाते निष्प्रभ ठरते. चाकणकर व खरात यांच्या संदर्भात होणारे आरोप-प्रत्यारोप पाहता यात नक्कीच काही 'राजकीय चाचेगिरी' असणे असंभव नाही. चाकणकर यांना महाराष्ट्र महिला आयोगाच्या अध्यक्ष केल्यानंतर अनेक राजकीय पक्षाच्या महिला नेत्यामध्ये असूया निर्माण झाली होती. त्यातूनच हा सगळं बनाव केला गेला का, याची शहनिशा एसआयटी करत आहे.

महाराष्ट्रात एकेकाळी धुळ्याचे धर्मभास्कर प्रकरण असेच रंगले होते. भाजपाचे माजी आमदार अनिल गोटे हे एका वृत्तपत्राचे वार्ताहर असतांना त्यांनी हे प्रकरण बाहेर काढले होते. पुढे काय झाले? धर्मभास्करचा मृत्यही झाला. परंतु या प्रकरणातून काही निष्पन्न झाले नाही. वातावरण मात्र दूषित झाले.

महाराष्ट्रात भोंदू बाबांच्या अशा अनेक घटना घडत आहेत. खरात हे प्रकरण काही नवे नाही. यामधून अनेक गुंतागुंत बाहेर येणार आहे. म्हणूनच मुख्यमंत्र्यांनी एसआयटी चौकशी लावली आहे. प्राथमिकदृष्ट्या चाकणकर या गुन्ह्यामध्ये दोषी दिसत असल्याकारणाने त्यांना राजीनामा देण्यास मुख्यमंत्र्यांनी फर्मावले आहे. तसे पाहिल्यास महाराष्ट्रात राष्ट्रवादीचा हा तिसरा बळी आहे. धनंजय मुंडे, माणिकराव कोकाटे या मंत्र्यांच्या राजीनाम्यानंतर आता चाकणकरांचा नंबर लागला. या प्रकरणात ज्यांची ज्यांची नावे पुढे येत आहेत त्यांच्यामध्ये साहजिकच अस्वस्थता निर्माण झाली आहे. एकनाथ शिंदे हे असे एक मंत्री आहेत की, ज्यांना लिखापढी चालत नाही. ते समोरच्याचे काम निव्वळ फोनवर करतात. त्यामुळे त्यांची लोकप्रियता वाढली आहे हे नाकारता येणार नाही. मग त्यांना अशा प्रकरणात गुंतवण्याचा प्रयत्न उबाठाने केल्यास आश्चर्य वाटणार नाही. खरात याच्या वादग्रस्त व्हिडीओमुळे खळबळ उडाली आहे.

हे भोंदूबाबा कोट्यवधी रुपयाची इस्टेट जमा करतात. राजकीय पाठबळ असल्याशिवाय हे कृत्य होऊ शकत नाही. हे जरी सत्य असले तरी त्यामागची कारणे शोधली पाहिजेत. अशा प्रकरणाला पायबंद घातला नाही तर पुढच्या काळात वाईट स्थिती निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. खरातचे जे प्रकरण उघड झाले आहे ते अत्यंत निदनीय आहे. ते किती सत्य व असत्य आहे याची शहनिशा एसआयटी करत आहे. मात्र एक निश्चित की राजकीय पाठबळ असल्याशिवाय कोट्यवधी रुपयाची इस्टेट एक व्यक्ती निर्माण करू शकत नाही. हा प्रश्न खरात-चाकणकर त्यांच्यापुरता मर्यादित नाही.

अनेक महिलांसोबत जर खरातने गैरप्रकार केले असतील तर ते अत्यंत निंदनीय आहे. समाज व्यवस्था ही आज संपूर्णपणे बिघडली आहे. त्याचाच परिपाक म्हणून अशोक खरातसारखे भोंदूबाबा निर्माण होतात. या भोंदूबाबाकडे येणाऱ्या महिलांना तुझ्या नवऱ्याला मारून टाकण्याच्या धमक्या हा खरात द्यायचा. अनेक भयानक गोष्टी यातून उघड होऊ शकतात. म्हणूनच एसआयटी चौकशी महत्वाची मानली जाते.

## पनीर-पुदिना कटलेट

**साहित्य :** २५० ग्राम ताजं पनीर, १/२ कप शिंगाड्याचे पीठ, २-३ हिरव्या मिरच्या, १/२ चमचा वाळवलेली पुदिन्याची पूड, १/२ चमचा लिंबाचा रस, बारीक चिरलेली कोथिंबीर, उपवासाचे मीठ चवीप्रमाणे.

**कृती :** पनीर कटलेट्स करण्यासाठी सर्वप्रथम पनीरला किसून घ्या. हिरव्या मिरच्यांना बारीक चिरून शिंगाड्याच्या पिठात पनीर आणि मिरच्या घाला. आता उरलेले साहित्य वाळवलेली पुदिन्याची पूड, लिंबाचा रस, मीठ, बारीक चिरलेली कोथिंबीर टाकून त्याला मिक्स करून हवे त्या आकाराचे कटलेट करा. तवा गरम करून त्यावर थोडे तूप किंवा शेंगदाण्याचे तेल टाकून दोन्हीकडून कुरकुरीत खमंग शॅलो फ्राय करून घ्या. तयार कटलेट्सला दही किंवा हिरव्या चटणीसोबत सर्व्ह करा.



# आपल्या स्वयंपाकघरातच आहेत सौंदर्यप्रसाधने



तुमच्या केसांपासून ते पायांच्या नखांपर्यंत सर्व गोष्टींची निगा राखण्यास मदत करण्यासाठी विविध तऱ्हेची सौंदर्यप्रसाधने बाजारामध्ये उपलब्ध आहेत. पण या सर्व प्रसाधनांमध्ये अगदी कमी प्रमाणात का होईना, पण रसायने असतातच. त्यामुळे क्वचितप्रसंगी या सौंदर्यप्रसाधनांमुळे ॲलर्जीदेखील उद्भवू शकते. हा धोका टाळायचा असेल, तर घरी तयार केलेली, नैसर्गिक पदार्थ असलेली प्रसाधने वापरणे कधीपण अधिक सोयीस्कर आणि फायद्याचे असते. घरी प्रसाधने तयार करण्यासाठी थोडाफार वेळ खर्ची घालावा लागत असला, तरी त्यापासून आपल्या त्वचेला किंवा केसांना मिळणारे फायदे पाहता, घरी प्रसाधने तयार करण्यासाठी थोडा वेळ जरूर द्यावा.



**ऑलिव्ह ऑईल :** नैसर्गिक मेकअप रिमूव्हर म्हणून ऑलिव्ह ऑईलचा वापर करावा. मेकअपसाठी वापरण्यात येणाऱ्या सौंदर्यप्रसाधनांमध्ये थोड्या प्रमाणात ॲस्ट्रिंजंट असते, ज्यामुळे आपली त्वचा कोरडी पडू लागते. मेकअप उतरवण्याकरिता ऑलिव्ह ऑईल वापरल्याने मेकअप संपूर्णपणे साफ होतोच, पण त्याशिवाय त्वचेचा कोरडेपणा दूर होऊन, त्वचेला आर्द्रता मिळते.

**टोमॅटो :** त्वचेची निगा राखण्याकरिता प्रत्येक वेळी ब्युटी पार्लरकडे धाव न घेता, घरच्या घरीच उत्तम फेस मास्क तयार करावा. नितळ, सुंदर त्वचेकरिता टोमॅटो अतिशय चांगला पर्याय आहे. टोमॅटोमधील 'अ' जीवनसत्त्व त्वचेवरील डाग हलके करण्यास सहाय्यक आहे. तसेच यामध्ये मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असल्याने त्वचेचा पोत सुधारून, त्वचा चमकदार बनते. हा मास्क बनवण्याकरिता एका टोमॅटोची पेस्ट चेहऱ्यावर लावून वीस मिनिटे राहू द्यावी. त्यानंतर चेहरा थंड पाण्याने धुवावा. या उपायाने त्वचा त्वरित उजळते.



**साखर :** थंडीमध्ये किंवा उन्हाळ्यामध्ये ओठ कोरडे पडून खरखरीत होतात. याचा उपाय आपल्या स्वयंपाकघरामध्ये अगदी सहज उपलब्ध आहे, तो म्हणजे साखर. साखरेमुळे त्वचेवरील मृत पेशी हटवल्या जाऊन, त्वचेमध्ये कोलाजेनचे प्रमाण वाढते. याकरिता एक टीस्पून खोबरेल तेलामध्ये एक लहान चमचा मध मिसळावा. या मिश्रणात दोन मोठे चमचे साखर घालून, मग थोडासा लिंबाचा रस घालावा आणि हे मिश्रण व्यवस्थित एकत्र करावे. ही तयार झालेली पेस्ट ओठांवर हळुवार गोलाकार चोळावी. दहा मिनिटे ही पेस्ट ओठांवर राहू देऊन, त्यानंतर पाण्याने धुवून टाकावी. ओठ टॉवेलने हळुवार कोरडे करून व्हॅसलिन लावावे. या उपायाने ओठ नेहमी मृदू राहतील.



**नारळ :** नारळाच्या दुधामध्ये 'ई' जीवनसत्त्व व केसांना पोषक नैसर्गिक तेले मुबलक मात्रेमध्ये असतात. ॲवोकाडोमध्ये केसांच्या पोषणासाठी आवश्यक प्रथिने व केसाच्या मुळांना पोषक तत्त्वे असतात. नारळाचे दूध व ॲवोकाडो वापरून तयार केलेला मास्क केसांसाठी वापरला असता, केस चमकदार आणि मुलायम बनतात. हा मास्क तयार करण्यासाठी ॲवोकाडो आणि नारळाचे दूध एकत्र करून त्यांची पेस्ट तयार करावी. ही पेस्ट केसांच्या मुळांपासून टोकांपर्यंत व्यवस्थित लावून घ्यावी. अर्धा तास ही पेस्ट केसांवर राहू देऊन त्यानंतर केस धुवावेत. या हेअर मास्कमुळे केसांच्या मुळांना ताकद मिळून, केसांची वाढ चांगली होते.

**मध आणि बदामाची पूड :** हात कोरडे पडून रखरखीत होत असल्यास त्यासाठी मास्क घरच्या घरी तयार करता येतो. एक लहान चमचा मधात थोडा लिंबाचा रस घालावा. त्या मिश्रणामध्ये एक मोठा चमचा बदामाची पूड व एक लहान चमचा अक्रोडची पूड घालावी. अक्रोडची पूड नसल्यास एक चमचा सूर्यफुलाचे तेल घालावे व हे मिश्रण हाताना चोळावे. पाच मिनिटांनी हात गार पाण्याने स्वच्छ धुवून टाकावेत. या उपायाने हात मुलायम राहतील.

# शहाळे : आरोग्याचा खजिना



कोवळा नारळ सर्वांनाच आवडतो. पण तो आरोग्यदायी घटकांचा खजिना असतो हे अनेकांना माहीत नसते. मोठे सेलिब्रिटीज, चित्रपट अभिनेते आणि अभिनेत्रींनाही नारळाच्या पाण्याचे महत्त्व कळते. अर्थात ते त्यांना कळते आणि ते हॉटेलातल्या महागड्या पेयांपेक्षाही शहाळे पिणे पसंत करतात. सामान्य लोकांनी त्यांचे अनुकरण म्हणून नाही पण नारळाचे महत्त्व समजून घेऊन त्याचा समावेश आपल्या रोजच्या आहारात केला पाहिजे. कोवळा नारळ हे निसर्गाने आपल्याला दिलेले वरदान आहे. २००६ साली करण्यात आलेल्या एका पाहणीनंतर शहाळ्याची वैशिष्ट्ये जर्नल ऑफ मेडिसिनल फूड या मासिकांत प्रकाशित करण्यात आली होती. त्यात शहाळ्याने शरीरातले कोलस्टेरॉल कमी होते असे म्हटले होते.

**आपल्याला** निसर्गाने नारळातून जे काही अनमोल असे दिले आहे त्यात कोणीही कसलीही भेसळ करू शकत नाही, हे त्याचे खास वैशिष्ट्य आहे. नारळाचे पाणी नेहमीच फ्रेश असते. ते कधी शिळे होत नाही. ते थंड असते. रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास त्याचा उपयोग होतो. एकदा याबाबत एक पाहणी करण्यात आली असता असे लक्षात आले की, पाहणीत गुंतलेल्या रुग्णांपैकी ७१ टक्के रुग्णांचा रक्तदाब कसलीही औषधे न देता केवळ शहाळ्याच्या पाण्याने कमी झाला. शहाळ्यातल्या मॅग्नेशियममुळे इन्सुलीन सेन्सिटीव्हिटी वाढते आणि मधुमेहाच्या रुग्णाला दिलासा मिळतो. ब्लड शुगर लेव्हल कमी होते. नारळाच्या पाण्यातले सोडियम आणि काही जीवनसत्त्वे ही ब्लड शुगर कमी करण्यास मदत करीत असतात. हे पाणी फ्री पार्टिकल्स आणि क्रिस्टल्स तयार करण्यास प्रतिबंध करते त्यामुळे किडनी स्टोन तयार होण्याचे टळते. काही कारणाने आणि अन्नात दोष निर्माण झाल्याने पचनशक्तीवर काही विपरीत परिणाम झाला असेल तर नारळाचे पाणी दिवसातून दोन वेळा प्यावे त्यामुळे पचनशक्ती ताळ्यावर यायला मदत होते. कारण या पाण्यात तंतुमय पदार्थ मोठ्या प्रमाणावर असतात. काही वेळा जुलाब होतात आणि डीहायड्रेशन होते. अशा वेळी नारळाचे पाणी प्यावे त्यामुळे शरीरातले पाण्याचे प्रमाण वाढते आणि डीहायड्रेशनमुळे आलेला अशक्तपणा कमी होतो. या पाण्याने चेहऱ्यावर तकाकी येते. केसही चांगले होतात. जगात गाजलेल्या काही टेनिसपटूंनी आपल्या तंदुरुस्तीचे रहस्य कोकोनट वॉटर हेच असल्याचे म्हटले होते. काही मॅरेथॉनपटूंनीही शहाळ्याला श्रेय दिले होते.



मागील काही वर्षांत भारतात ग्रीन टीचे सेवन अधिक वाढले आहे. ग्रीन टी आरोग्यासाठी चांगले आहे, यात शंकाच नाही. ग्रीन टीमध्ये अनेक प्रकारचे अँटीऑक्सिडेंट्स असतात. जे शरीरातील मेटाबॉलिज्म सुधारते, कॉलेस्ट्रॉल कमी करते. ग्रीन टी जिंक, मॅग्नीज आणि व्हिटामीन ए, बी, सी ची मात्रादेखील असते. मात्र हे सर्व फायदे असले तरी ग्रीन टीच्या अतिसेवनामुळे आरोग्याला देखील नुकसान पोहोचते.

# 'ग्रीन टी'च्या अतिसेवनामुळे होऊ शकतात या समस्या



**तोंडात फोडी येणे :** ग्रीन टीमध्ये टॅनिंस तत्त्व असते. जास्त ग्रीन टी प्यायल्याले टॅनिंस त्वचा कोरडी पडणे, तोंड कोरडे पडणे, पोट दुखणे आणि तोंडात फोडी येणे यासारख्या समस्या होतात.

**ब्लड प्रेशर वाढते :** अधिक प्रमाणात ग्रीन टीचे सेवन केल्याने ब्लड प्रेशरचा देखील धोका निर्माण होतो. ग्रीन टीमध्ये कॅफिन अधिक मात्रेत असतात. याच्या अधिक सेवनाने हृदयावर दबाव पडतो व तुमचे ब्लड प्रेशर वाढते.

**अशक्तपणा होऊ शकतो :** ग्रीन टीमध्ये काही असे तत्त्व असतात, जे शरीरातील आयरनला (लोह) शोषून घेण्यापासून रोखते. त्यामुळे तुम्ही ग्रीन टीचे अधिक सेवन करत असाल तर तुम्ही ज्या पदार्थांचे सेवन करता त्यातील आयरन शरीराला मिळणार नाहीत. अशा परिस्थितीत रेड ब्लड सेल्स कमी होतात आणि अशक्तपणा येऊ शकतो.

**मानसिक तणाव आणि चिंता वाढणे :** ग्रीन टी तणाव कमी करण्यासाठी फायदेशीर आहे. मात्र अति सेवनामुळे याचा उलट परिणाम होऊन मानसिक तणाव आणि चिंतादेखील वाढते.

# गुणांचा खजिना - घृतकुमारी (ॲलोवेरा/कोरफड)

**ॲलो**वेरा आपल्या घरामध्ये किंवा ऑफिसमध्ये विनासायास लावता येण्यासारखे असते. आजकाल ॲलोवेराचे आरोग्याच्या दृष्टीने फायदे समोर यावयास लागल्याने रस, जेल अशा अनेक प्रकारे लोक ॲलोवेराचा उपयोग करताना दिसत आहेत. दात घासल्यानंतरही दातांमध्ये प्लाक किंवा किटाणू राहतातच. त्यामुळे तोंडामधून क्वचित दुर्गंधी येऊ लागते. ही दुर्गंधी येऊ नये यासाठी माऊथवॉश उपयोगात आणला जातो. ॲलोवेराच्या रसाचा वापरदेखील प्राकृतिक माऊथवॉश म्हणून करता येतो. या रसामुळे तोंडातील प्लाक आणि किटाणू दूर होऊन दातांचे आरोग्य चांगले राहते. ॲलोवेराचा वापर माऊथवॉश म्हणून केल्याने हिरड्याही बळकट होतात. कित्येकदा जेवण जास्त झाल्याने, जेवणाच्या वेळा गडबडल्याने किंवा जास्त तिखट, मसालेदार पदार्थ खाल्ल्याने छातीत जळजळ होत असल्याची भावना होते किंवा ॲसिडीटी होते. अशावेळी ॲलोवेराच्या रसाच्या सेवनाने फायदा होतो. यामुळे छातीतील जळजळ दूर होऊन ॲसिडीटीही कमी होते. तसेच दररोज सकाळी रिकाम्या पोटी ॲलोवेराचा रस कोमट पाण्यातून घेतल्यास पोट साफ होण्यास मदत होते. केस गळत असल्यास ॲलोवेराचा गर केसांना लावल्याने फायदा होतो. तसेच चेहऱ्यावर उष्णतेमुळे मुरुमे येत असल्यासही ॲलोवेराच्या गराने फायदा होतो. या गराने त्वचेचा रंग उजळण्यास व पोत सुधारण्यास मदत होते. त्याचमुळे पुष्कळशा स्कीन क्रीम्समध्ये ॲलोवेराच्या गराचा अंश मिसळलेला असतो. ॲलोवेराच्या गराच्या वापराने वयपरत्वे त्वचेवर आलेल्या सुरकुत्याही कमी होतात व त्वचा सुंदर दिसू लागते.



अनेक वर्ष एकच मोबाइल फोन वापरल्यामुळे तो स्लो होऊ शकतो. असा स्मार्टफोन काही ट्रिक्सच्या मदतीने फास्ट करता येतो. यात फॅक्ट्री रीसेट, अँड्रॉइड अपडेट, फोन स्टोरेज क्लियर करणे, लाइट ॲप्सचा वापर इत्यादी ऑप्शन आहेत.



# जुन्या मोबाइल फोनचा स्पीड कसा वाढवायचा? जाणून घ्या सोप्या ट्रिक्स

असे अनेक लोक आहेत जे एक मोबाइल कमीत कमी ३-४ वर्ष वापरतात. विशेषतः मीडिल क्लास कुटुंबात युजर एकच स्मार्टफोन अनेक वर्ष वापरतात. परंतु स्मार्टफोन जुना झाल्यावर त्याची परफॉर्मन्सदेखील स्लो होऊ लागतो. त्यामुळे रोज फोन वापरताना समस्या येऊ लागतात. ही समस्या सोडवण्यासाठी आम्ही काही ट्रिक्स सांगितल्या आहेत ज्यामुळे जुन्या फोनचा स्पीड वाढू शकतो.

फॅक्ट्री रीसेटमुळे अनेक समस्या सोडवता येतात. फॅक्ट्री रीसेट तुमच्या स्मार्टफोनला पुन्हा फास्ट, स्मूद व नव्यासारखा बनवण्याची चांगली पद्धत आहे. स्मार्टफोन रीसेट करण्यापूर्वी तुमच्या मोबाइल फोनच्या डेटा बॅकअप घेणं आवश्यक आहे. तुम्ही मोबाइलमधील सर्व ॲप्स, फोटो, व्हिडीओ तसेच अन्य फाईल्स देखील तुमच्या डाटा बॅकअपमध्ये घेऊ शकता. फोन बॅकअप स्मार्टफोनमधील मायक्रोएसडी कार्ड किंवा गुगलमध्ये स्टोर केला जाऊ शकतो, त्यामुळे फोन फॅक्ट्री रीसेट झाल्यानंतर पुन्हा रिकव्हर करता येईल.

**अँड्रॉइड अपडेट**

अँड्रॉइड स्मार्टफोन्स गुगलद्वारे बनवण्यात येणाऱ्या अँड्रॉइड ओएसवर चालतात. ही कंपनी दरवर्षी आपल्या अँड्रॉइड ऑपरेटिंग सिस्टमचं नवीन व्हर्जन घेऊन येते ज्यात अनेक नवीन अपडेट असतात. विशेष म्हणजे अँड्रॉइड ओएसचा नवीन अपडेट फक्त नवीन फीचर्स घेऊन येत नाही तर त्यात अनेक बग्स काढले जातात. वेगवेगळ्या ॲप्स, वेबसाइट्स, गेम्स, ऑनलाइन ॲक्टिव्हिटी तसेच इंटरनेट ॲक्सेसमुळे तुमच्या स्मार्टफोनमध्ये अनेक प्रकारचे बग्स देखील येतात त्यामुळे फोनच्या प्रोसेसिंगवर एक्स्ट्रा लोड येतो. हे बग्स फक्त प्रोसेसिंग स्लो करत नाहीत तर अनेक ॲप्सवर देखील प्रभाव टाकतात. अँड्रॉइड अपडेट्समध्ये डेव्हलपर हे बग्स काढून टाकण्याचे कोड टाकतात. त्यामुळे तुमचा स्मार्टफोन कायम नवीन अँड्रॉइड व्हर्जनवर अपडेट करावा.

**फोन स्टोरेज**

फोनची स्टोरेज भरल्यामुळे डिव्हाइसच्या प्रोसेसिंगवर प्रभाव पडतो आणि तो स्लो होतो. Support.google नुसार जर तुमच्या स्मार्टफोनची स्टोरेज ९० टक्क्यांपर्यंत फुल होते तेव्हा फोनमध्ये प्रॉब्लम येण्यास सुरुवात होऊ शकते. अशावेळी तुमच्या फोन स्टोरेज वर लक्ष ठेवावं आणि अनावश्यक फोटोज व व्हिडीओज डिलीट करावे. अत्यावश्यक मीडिया फाइल्सचा इतरत्र बॅकअप घेऊन मोबाइलमधून काढून टाकाव्यात.

**लाइट अँड्रॉइड ॲप्सचा वापर**

लाइट अँड्रॉइड ॲप्स जुन्या मोबाइल फोन्ससाठी उपयुक्त ठरू शकतात. हे ॲप्स फोनमध्ये कमी स्टोरेज वापरतात तसेच जास्त इंटरनेट देखील वापरत नाहीत. असे ॲप्स वापरल्यावर फोनच्या प्रोसेसर व बॅटरीवर देखील जास्त लोड येत नाही. विशेष म्हणजे लाइट अँड्रॉइड ॲप्स फुल व्हर्जनच्या फास्ट असतात. हे लाइट अँड्रॉइड ॲप्स कमी रॅम व जुन्या प्रोसेसरवर देखील स्मूद तसेच लॅगफ्री चालतात. उदा. जीमेल गो, गुगल गो, यूट्यूब गो आणि मॅप्स गो तसेच फेसबुक लाइट, मॅसेंजर लाइट, इंस्टाग्राम लाइट इत्यादी.

# 'या' समस्यांना टाळायचं असेल तर साखरेला ठेवा दूर!

**आपल्या** रोजच्या आहारात कमी अधिक प्रमाणात साखरेचं प्रमाण चांगलंच असतं. काही वेळा प्रत्यक्षरीत्या तर काही वेळा अप्रत्यक्षरीत्या साखर आपल्या शरीरात जात असते. साखर शरीरासाठी आवश्यक घटक आहे. मात्र या साखरेचं प्रमाण नियंत्रणात ठेवण्याचीही तितकीच गरज आहे. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा घातक ठरू शकतो. त्याप्रमाणेच साखरेचंही आहे. शरीरात साखरेचं प्रमाण अधिक असेल तर अनेक आजारांना सामोरं जावं लागतं. त्यामुळे आहारात साखरेचं प्रमाण नियंत्रणात असण्याची गरज आहे.



- आहारात साखरेचं प्रमाण जास्त असेल तर त्याचा परिणाम थेट तुमच्या चेहऱ्यावर दिसून येतो. त्यामुळे साखरेचं प्रमाण नियंत्रणात असण्याची गरज आहे. शरीरात साखरेचं प्रमाण नियंत्रणात असेल तर त्वचेचा पोत सुधरतो. त्वचा मुलायम आणि तजेलदार होते. विशेषतः रात्रीच्या वेळी साखरयुक्त पदार्थ कमी खाल्ले तर चेहऱ्यावर सुरकुत्या येत नाहीत. तसंच चेहऱ्यावरील मुरुम, डागही क मी होतात.
- साखरेचं प्रमाण नियंत्रणात असेल तर शांत झोप लागते.
- साखर जास्त खाल्ल्याने जळजळ आणि श्वासोच्छ्वास घेण्यास त्रास होतो.
- साखर खाल्ल्यामुळे वजन झपाट्याने वाढतं. त्यामुळे डोनट्स, पेस्ट्री, केक, मिठाई असे पदार्थ शक्यतो खाणं टाळा.
- साखरेचे प्रमाण जास्त असल्यास स्मरणशक्ती कमकुवत होते.
- साखरेमुळे मधुमेह होण्याची शक्यता असते.

# ओठांचा काळसरपणा दूर करण्यासाठी उपाय...

ओठ काळसर पडण्यामागे अनेक कारणे असू शकतात. असंतुलित आहार, पिग्मेंटेशन, खूप वेळ उन्हामध्ये वावरणे, हलक्या प्रतीची प्रसाधने, विशेषतः हलक्या प्रतीची लिपस्टिक वापरणे, अशा किती तरी कारणांमुळे ओठ काळसर पडू शकतात. पण काही साध्या उपायांचा अवलंब केल्यास ओठांचा रंग पुन्हा पूर्ववत होण्यास सहाय्य मिळते.

**ग्रीन टी**

आपण दिवसभरात अनेकदा चहा किंवा कॉफी घेत असतो. पावसाळ्यात किंवा थंडीच्या मोसमात तर चहा किंवा कॉफी पिण्याचे प्रमाण अजूनच वाढते. पण चहा किंवा कॉफीच्या अतिसेवनाने देखील ओठ काळसर दिसू शकतात. त्यामुळे दिवसातून अनेकदा चहा किंवा कॉफी घेण्यापेक्षा, ग्रीन टीच्या सेवनाचे प्रमाण वाढवा. ग्रीन टीमध्ये असलेले पॉलिफेनॉल्स शरीरातील फ्री रॅडिकल्स कमी करून, उन्हामुळे किंवा चहा - कॉफीच्या अतिसेवनाने काळसर पडलेले ओठ पुन्हा पूर्ववत करण्यास मदत करतात. ग्रीन टी च्या टी-बॅग्स थोड्याशा पाण्याने ओलसर करून घेऊन, त्याने ओठांवर हलक्या हाताने मसाज केल्यासही ओठांचा काळसरपणा दूर होण्यास मदत मिळते, तसेच ओठ मऊ राहतात.



**नारळ :** आपल्या आहारात नारळाचा समावेश अवश्य करा. हे आपल्याला निरनिराळ्या प्रकारे करता येईल. नारळाचे पाणी प्या, त्याचे ताजे खोबरे भाज्यांवर किंवा गरमागरम पोहे, उपमा, खिचडीवर घालून खा किंवा कुठल्याही भाजीच्या ग्रेव्हीमध्ये नारळाचे दूध वापरा. नारळाचे तेलही स्वयंपाकामध्ये वापरता येऊ शकेल. नारळाच्या सेवनाने त्वचा नितळ राहते. नारळाचे तेल दररोज ओठांना लावल्यास ओठ गुलाबी व मऊ राहतील.

**मध :** रात्री झोपण्यापूर्वी थोड्या मधाने ओठांवर हलक्या हाताने मसाज करावा. हे मध रात्रभर ओठांवर तसेच राहू द्यावे. मधाचा वापर आपल्या आहारामध्येही नियमित करावा. मधात अँटी ऑक्सिडंट्स व मॅग्नेशियम हा क्षार भरपूर प्रमाणात असल्यामुळे ओठांना मृदुता प्राप्त होऊन, त्यांचा काळसरपणा दूर करण्यास मध उपयुक्त आहे. त्याचप्रमाणे टोमॅटोही ओठांचा काळसरपणा दूर करण्यासाठी उत्तम आहेत. यामध्ये असलेले सेलेनियम सूर्याच्या प्रखर उन्हापासून ओठांचे रक्षण करते. टोमॅटोचा वापर आपल्या आहारामध्ये तर करावाच, शिवाय उन्हामधून फिरून आल्यानंतर त्वरित टोमॅटोची पेस्ट ओठांवर लावावी. असे केल्याने, उन्हामुळे ओठांवर आलेला काळसरपणा दूर होतो.



**अक्रोड :** अक्रोडमध्ये असलेले ओमेगा ३ फॅटी ॲसिड्स त्वचेमधील कोलाजेन वाढवण्यास सहाय्य करतात. त्वचेमध्ये कोलाजेनचे प्रमाण वाढल्याने त्वचा लवचिक होते. अक्रोडची जरा जाडसर पेस्ट बनवून त्याने ओठांवर हलक्या हाताने मसाज करावा. असे केल्याने ओठांच्या त्वचेवरील मृत पेशी निघून जाऊन ओठांचा काळसर पडलेला रंग हलका होण्यास मदत होईल. तसेच दह्याच्या वापराने त्वचा नितळ होऊन त्यावरील सुरकुत्या नाहीशा होण्यास मदत मिळते. त्यामुळे आपल्या आहारामध्ये दह्याचा समावेश अवश्य करावा. दह्यामध्ये थोडेसे केशर घालून त्याने ओठांचा मसाज केला असता, ओठांवरील पिग्मेंटेशनमुळे आलेला काळसरपणा दूर होण्यास मदत मिळेल.

**लिंबाचा रस :** आपल्या शरीरामधील ॲसिड्स व तीव्र अल्कलींमुळे ओठ काळसर पडू शकतात. गरम पाण्यामधून लिंबाचा रस घेतल्याने शरीरामधून ही ॲसिड्स व अल्कली बाहेर टाकण्यास मदत मिळते. लिंबू हे अत्यंत प्रभावी ब्लीच आहे. थोडीशी साखर एका लिंबाच्या लहान फोडीवर घालून त्याने ओठ चोळल्यास ओठांचा काळसरपणा दूर होतो. त्याचप्रमाणे ॲलो व्हेरा किंवा कोरफड, ओठांचा काळसरपणा दूर करण्यास उपयुक्त आहे. ॲलो व्हेराच्या रसाचा समावेश आपल्या आहारात करावा आणि त्याच्या गराने ओठांवर नियमित मसाज करावा. या उपायाने ओठांचा काळसरपणा दूर होऊन ओठ पुनश्च गुलाबी व मृदू होतील.



# पी हळद आणि हो बरी

**मराठीत** एक म्हण आहे. पी हळद अन् हो गोरी. या म्हणीचा अर्थ काही वेगळा आहे. कोणत्याही उपायाचा परिणाम पटकन होत नसतो. हळद प्यायल्यावर लगेच कोणी गोरी होत नसते असे या म्हणीतून सुचवायचे आहे, पण प्रत्यक्षात मात्र हळद ही काही बाबतीत चटकन आणि बराच गुण देणारी आहे. असे काही प्रयोगातही दिसून आले आहे. काही लोकांनी हळद मिसळलेले पाणी दररोज सकाळी प्राशन करून त्याचे फायदे नोंदवले आहेत तर काहींनी हळदीचा चहा किती गुणकारी असतो याचा अनुभव घेतला आहे. दररोज सकाळी साधारण ग्लासभर पाणी घ्यावे. ते गरम करावे आणि कोमट झाल्यावर त्यात अर्धा चमचा हळद मिसळावी. हे पाणी थंड झाल्यावर प्यावे त्याचे अनेक फायदे होतात.



हळद ही जंतुनाशक असते. त्यामुळे ती अनेक रोगांचा सामना करण्यास उपयोगी पडते. काही वेळा ती काही रेडिएशन्सचाही प्रतिकार करण्यास फायदेशीर ठरली आहे. सध्या आपण मोबाईल फोन फार वापरतो आणि त्याच्या रेडिएशन्सचा आपल्यावर काही परिणाम होण्याची शक्यता असते. आपल्याला कोणत्या ना कोणत्या स्वरूपात हळद वापरायला मिळाली तर अशा परिणामांपासून आपण दूर राहू शकतो. हळद पाण्यात मिसळून प्यावी किंवा आहारात तिचा समावेश अवश्य होईल याची दक्षता घ्यावी. आपल्या समाजात दूध आणि हळद पिण्याची पद्धत आहे. त्यामुळे बसलेला घसा मोकळा होतो. घशाला कसला संसर्ग झाला असेल तर हळद आणि दूध गुणकारी ठरते. खोकला आल्यावर तर हळद आणि दूध घेतातच. ते घेतल्यावर दुसरे कसलेही औषध घेण्याची गरज नाही असे मानतात.

काही लोक हळदीचा चहा तयार करतात. तो तयार करण्याची पद्धत आहे. कपभर पाण्यात चमचाभर हळद टाकून हे मिश्रण उकळा. नंतर त्याला खाली उतरवून त्यात थोडा मध टाका. त्याशिवाय त्यात थोडे लिंबू पिळा किंवा त्यात संत्र्याचा रस मिसळा. त्यामुळे या मिश्रणाला चांगली चव येईल. असा हा चहा प्याल्याने वजन कमी होण्यास मदत होते. संधिवाताचा त्रास कमी होतो. शिवाय यात काही मिनरल्स रोगप्रतिकारक आणि कर्करोगास प्रतिबंध करणारे आहेत. जगाच्या काही भागात हळदीचा असा चहा फार लोकप्रिय आहे. कारण त्यामुळे मधुमेहाचा उपद्रव कमी होतो. हळद हे अगदी सहजगत्या उपलब्ध होणारे औषध आहे. त्याचा वापरही आपण करीत असतो, पण त्याचे अनेक फायदे आपल्याला माहीतही नसतात.

# मुंबईत भटक्या कुत्र्यांचा उपद्रव कायम...
## २५ हजारांवर कुत्र्यांचे निर्बीजीकरण... तरीही त्रास सुरूच

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

मुंबईतील भटक्या कुत्र्यांचा उपद्रव रोखण्यासाठी निबीर्जीकरणावर भर देण्यात आला आहे. जानेवारी २०२५ ते जानेवारी २०२६ पर्यंत तब्बल २५ हजार ९८० भटक्या कुत्र्यांचे निबीर्जीकरण करण्यात आल्याची माहिती मुंबई महापालिकेच्या देवनार पशुवधगृहाकडून देण्यात आली. दरम्यान, भटक्या कुत्र्यांसह मांजराचे निबीर्जीकरण करण्यात आले असून वर्षभरात ११ हजार ७२५ मांजराचे निबीर्जीकरण करण्यात आल्याचे विभागाने सांगितले.

मुंबईत भटक्या कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून मुंबईत ९५ हजार भटके कुत्रे आहेत. गेल्या काही वर्षात भटक्या कुत्र्यांनी मुंबईकरांचा चावा घेतला असून अनेकांच्या जीवावर बेतले आहे. मुंबई शहरात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला असून भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रणात आणण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. यापैकी एक म्हणजे भटक्या कुत्र्यांचे निबीर्जीकरण. मुंबईतील भटक्या कुत्र्यांचे निबीर्जीकरण करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली असून या मोहिमेंतर्गत वर्षभरात २५ हजार ९८० भटक्या कुत्र्यांचे निबीर्जीकरण करण्यात आले आहे. भटक्या कुत्र्यांसह मांजराचाही उपद्रव वाढला असून मांजरांची संख्या नियंत्रणात आणण्यासाठी वर्षभरात ११ हजार ७२५ मांजराचे निर्बीजीकरण करण्यात आले आहे.



**रेबीजमुळे ३६ टक्के मृत्यू भारतात**

दरम्यान, जागतिक आरोग्य संघटनेच्या माहितीनुसार, कुत्रा चावल्यानंतरच्या वैद्यकीय उपचारांबाबत सामान्यांमध्ये खूप कमी प्रमाणात जनजागृती आहे. यामुळेच जगभरात दरवर्षी हजारो लोकांना रेबीजमुळे आपले प्राण गमवावे लागतात. रेबीजमुळे जगभरात होणाऱ्या मृत्यूपैकी ३६ टक्के मृत्यू एकट्या भारतात होतात. आशिया आणि अफ्रिकेत रेबीजचा संसर्ग होण्याचे प्रमाण अधिक आहे.


**खाद्य घालण्यासाठी १८ अधिकृत ठिकाणे**

भटक्या कुत्र्यांना ठराविक ठिकाणी अन्न देण्यासाठी शहरात १८ अधिकृत फिडिंग स्पॉट्स निश्चित करण्यात आले आहेत. या ठिकाणी प्राणीप्रेमींना नियमानुसार कुत्र्यांना अन्न देण्याची परवानगी दिली जाते. यामुळे रस्त्यावर अन्न टाकणे टाळले जाते आणि परिसरातील स्वच्छताही राखली जाते.

# गॅस सिलिंडर बुक होत नसेल तर...
## 'या' हेल्पलाईन नंबरवर तात्काळ मिळेल मदत

■मुंबई। प्रतिनिधी,

मागील काही दिवसांपासून अनेक लोकांना एलपीजी सिलिंडर बुक करताना काही समस्यांना सामोरं जावं लागत आहे. सिलिंडर बुक झाल्यावर त्याची डिलिव्हरी होत नसल्याच्या तक्रारी काही ग्राहकांनी केल्या आहेत. त्यामुळे लोकांना गॅस एजन्सित अनेक फेऱ्या माराव्या लागत आहेत. जर तुम्हालाही सिलिंडर बुक करण्यापासून डिलिव्हरी पर्यंतच्या समस्या जाणवत असतील, तर खाली दिलेल्या क्रमांकावर तुम्ही तक्रार नोंदवू शकता. याबाबतची सविस्तर माहिती जाणून घ्या.



**तातडीनं मदत मिळण्यासाठी हेल्पलाईन नंबर**

जर तुम्ही ऑनलाईन पद्धत वापरत नसाल, तर गॅस कंपनीच्या टोल-फ्री नंबरवरही कॉल करू शकता. Indane Gas: 1800-2333-555 HP Gas: 1800-2333-555 Bharat Gas: 1800-22-4344

**सिलिंडर बुक करताना का येतात अडचणी?**

'नवे नियम' हा बुकिंग न होण्यामागचं सर्वात मोठं कारण आहे.सरकारने नुकतच गॅस पुरवठा सुरळीत करण्यासाठी बुकिंग नियमांमध्ये बदल केलाय. त्यामुळे आता घरगुती गॅस सिलिंडरमध्ये कमीत कमी 25 दिवसांचा गॅप अनिवार्य केला आहे. तुम्ही जर आताच सिलिंडर घेतलं असेल, तर २५ दिवस पूर्ण झाल्याशिवाय तुम्हाला दुसरं सिलिंडर बुक करता येणार नाही.याशिवाय अनेकदा मोबाईल ॲप किंवा वेबसाईटवर अनेक लोकांचा वापर वाढल्याने सिस्टम स्लो होतं. यामुळे बुकिंगमध्ये समस्या येते. जर तुमची गॅस एजन्सी तुमची समस्या समजून घेत नसेल किंवा जाणूनबुजून उशिर करत असेल, तर तुम्ही थेट PG Portal वर तक्रार दाखल करू शकता. हे एक सरकारी प्लॅटफॉर्म आहे. जिथे तुमची तक्रार थेट संबंधीत विभागापर्यंत पोहोचू शकते आणि त्यावर योग्य ती कार्यवाही होऊ शकते. PG Portal वेबसाईट ओपन करा. तुमचं अकाऊंट बनवा किंवा लॉग ईन करा. 'Lodge Public Grievance' वर क्लिक करा. 'Ministry of Petroleum And Natural Gas'च्या ऑप्शनवर क्लिक करा. इथे एलपीजीच्या समस्यांबाबत लिहा. ग्राहक क्रमांक आणि एजन्सीची माहिती टाकून सबमीट करा.

# गेल्या वीस वर्षांत कोट्यवधी झाडे लावूनही 'महाराष्ट्र उजाड'
## सरकारचे कोट्यवधी रुपये मातीत



**वाघ कॉरिडॉरसाठी उदासीनता**

सातपुडा हा वनराजी आणि वन्यप्राण्यांनी समृध्द होता. त्यात अनेक वनौषधी वृक्ष होते. वनविभागाने अनेक वर्ष सातत्याने नाकारले असले तरी दाट जंगलामुळे सातपुड्यात वाघांचा अधिवास होता. आज जिल्हयात सहा ते आठ वाघ आहेत. वाघाच्या कॉरीडॉरसाठी वन्यप्राणी संघटना अनेक वर्ष लढा देत असल्या तरी उदासीन वनविभागाचे कागदपत्र हलत नाही. शासनाने दिलेले वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट कागदोपत्री पूर्ण करण्याचे काम केले जाते.

■जळगाव। प्रतिनिधी,

राज्यात दरवर्षी कोट्यवधी झाडे लावली जातात. शासकीय स्तरावरून वृक्ष लागवडीचे कार्यक्रम आखले जातात. राज्यात मोठयाप्रमाणावर जंगलतोड होत आहे. गेल्या २० वर्षात कोट्यवधी झाडे लावूनही 'महाराष्ट्र उजाड' दिसत आहे.

राज्यातली जंगले ही उजाड झाली आहेत. पावसाचे प्रमाण कमी झाले आहे. महाराष्ट्राला सतत दुष्काळाचा सामना करावा लागत असल्याने केवळ पावसासाठी जंगल वाढवणे हाच पर्याय असल्याचे पर्यावरणप्रेमी सांगत असले तरी ते गांभीयार्ने घेतले जात नाही. एक उपचार म्हणून राज्य शासनाकडून वृक्ष लागवडीसाठी विविध धोरणे आखली जातात.

२०१२ मध्ये शतकोटी वृक्ष योजना जाहीर झाली. २०१४ मध्ये शासन बदलताच पन्नास कोटी वृक्ष लागवडीची योजना जाहीर झाली. त्याचा मोठा गाजावाजा केला गेला. वृक्ष लागवडीचे कोटींच्या घरात असलेले आकडे ऐकून वाचून सामान्य माणूस सुखावला. प्रत्यक्षात कोटी सोडा पण लाखात झाडे लावलेली दिसली नाहीत. केवळ वृक्ष लागवडीचे उददीष्ट पूर्ण करण्यासाठी कागदावर झाडे लागली. विविध शासकीय कार्यालयांना वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट दिले गेले. शाळांना 'एक मुल एक झाड' लावायला सांगितले गेले. सर्वांचाच उत्साह मोठा होता शाळांनी आपल्या आवारात तीन हजार, दोन हजार वृक्ष लावल्याचे अहवाल पाठवत सवतःची पाठ थोपटली. मात्र शाळेचे जागाचे क्षेत्रफळ किती आणि लावलेल्या झाडांचे क्षेत्रफळ किती हा प्रश्न कुणीही विचारला नाही.

शतकोटी वृक्ष लागवड योजनेत जळगाव जिल्हयात २०१२ ते २०१४ या तीन पावसाळयात चार कोटी ४१ लाख २६ हजार वृक्ष लावले गेले. त्यानंतर पन्नास कोटी वृक्ष लागवड योजनेत नंतर एक कोटी ९४ लाख वृक्ष लावले गेले. म्हणजेच जवळजवळ दहा वर्षात सहा कोटीहून अधिक वृक्ष लावले गेले. या अगोदरच्या दशकात साडेसात कोटी वृक्ष लावले गेले होते.

गेल्या २० वर्षात १५ कोटी वृक्ष लावले. जवळजवळ दोनशे कोटींचा चुराडा झाला. तरीही आज जळगाव जिल्हा हा उजाड दिसत आहे. लावलेली ही कोटयावधी झाडे कोठे गेली हे कुणीही विचारण्याची हिंमत करत नाही. जळगावचे उन्हाळयात तापमान ४६ अंशावर जाते. वृक्षलागवडीची कोटयावधींची आकडेवारी पाहिल्यावर वृक्ष कागदोपत्री लावले गेले नाहीत ना अशी शंका सामान्य माणसाला येऊ लागते. जळगाव शहरात माजी जिल्हाधिकारी रूबल अग्रवाल यांचे हस्ते मेहरूण तलाव परिसरात शंभर वडाची झाडे लावली गेली. आज एकही वडाचे झाड तेथे नाही. जळगाव शहरात कॉंक्रीटचे रस्ते केले जात आहेत. त्यामुळे उन्हाची तीव्रता वाढत आहे. तापमान अधिक जाणवत आहेत. गारव्यासाठी नागरिक झाडे शोधत आहेत. त्यामुळे प्रश्न विचारला जातो की ही लावलेली झाडे गेली कुठे, कोटयावधी झाडे लावून जिल्हा महाराष्ट्र उजाड कसा? गेल्या काही वर्षात कोट्यवधी झाडे लावली तरी जिल्हा राज्य उजाड झाले असले तरी आमच्या लोकप्रतिनिधींना ते दिसत नाही, हे आमचे दुर्दैव.

# उष्णतेच्या कहरास प्रदूषणाचा विळखा



■ठाणे। प्रतिनिधी,

जागतिक हवामान दिनाच्या पार्श्वभूमीवर ठाणे शहरात उष्णतेचा पारा आणि हवेतील सल्फर डायऑक्साइड, ओझोन व घातक धूलिकणांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. मार्चच्या सुरुवातीलाच तापमानाने ४१ अंश सेल्सिअसचा टप्पा गाठल्याने ठाणेकर होरपळून निघत असून, हवेतील या विषारी घटकांमुळे सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे.

महापालिकेकडून मिळालेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, चालू महिन्यातील पहिल्या २० दिवसांपैकी तब्बल १० दिवस हवा अतिशय दूषित नोंदवली गेली आहे. यामध्ये ओझोनची पातळी १८८ पर्यंत पोहोचली असून, धूलिकणांचे (पीएम१०) प्रमाण १३० च्या आसपास नोंदवले गेले आहे. त्यामुळे शहरातील हवेची गुणवत्ता झपाट्याने खालावत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

वाढती वाहनसंख्या आणि ठिकठिकाणी सुरू असलेली बांधकामे या परिस्थितीला अधिक गंभीर बनवत आहेत. पर्यावरण अभ्यासकांनी ही स्थिती हवामान बदलाच्या व्यापक संकटाचा भाग असल्याचे स्पष्ट केले आहे. यावर मात करण्यासाठी बांधकामातील धूळ नियंत्रण, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करणे आणि मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करणे अत्यावश्यक झाले आहे. जागतिक हवामान दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम न ठरता पर्यावरण संवर्धनासाठी ठोस कृतीची हाक ठरावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# मे 2026 पासून वसई रोड टर्मिनसच्या कामाला सुरूवात




■वसई। प्रतिनिधी,

वसई रोड रेल्वे स्थानकात भव्य कोचिंग टर्मिनस उभारण्याच्या हालचालींना वेग आला असून, मे २०२६ पासून या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार असल्याचा दावा रेल्वे प्रशासनाने केला आहे. या प्रकल्पामुळे लांब पल्ल्याचा प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

वसईतून मोठ्या संख्येने प्रवासी बाहेरगावी प्रवास करत असतात. परंतु येथील नागरिकांना बाहेरगावी जाण्यासाठी वांद्रे, कुर्ला, दादर आणि सीएसएमटी रेल्वे स्थानकात जावे लागते. अशा वेळी सामानासह प्रवास करताना प्रवाशांची परवड होत असते. यासाठी वसई रोड रेल्वे स्थानकात टर्मिनस बनवावे अशी मागणी गेल्या अनेक वर्षापासून रेल्वे प्रवासी करत आहेत.

मागील काही वर्षापासून हा प्रकल्प मार्गी लागावा यासाठी रेल्वे प्रशासनाकडून ही प्रयत्न सुरू होता. मध्यंतरी विविध प्रकारच्या निर्माण होणाऱ्या अडचणी यामुळे या प्रकल्पाचे काम मार्गी लागले नव्हते. त्यानंतर नोव्हेंबर २०२४ मध्ये पालघरचे खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी पुन्हा या प्रश्नाचा पाठपुरावा केंद्रात केला होता. यावर केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यावर मागणी मान्य झाल्याची घोषणा केली होती. याशिवाय येथील सामाजिक कार्यकर्ते जॉय फरगोस यांनी सुद्धा या याबाबतचा पाठपुरावा सुरू ठेवला होता. फरगोस यांनी रेल्वे प्रशासनाकडे विचारणा केली होती. याला उत्तर देताना वसई रेल्वे स्थानकात टर्मिनस प्रकल्पासंदभार्तील निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून कामाच्या वाटपाची प्रक्रिया सुरू आहे. या सर्व प्रक्रियेनंतर मे २०२६ पासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने पत्राद्वारे दिली आहे.वसई-विरार परिसरातील वाढत्या लोकसंख्येमुळे रेल्वे सेवांवर मोठा ताण निर्माण झाला आहे. लाखो प्रवाशांना दररोज प्रचंड गर्दी, अपुरी सुविधा आणि विविध गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर वसई रोड कोचिंग टर्मिनस प्रकल्प हा अत्यंत आवश्यक आणि दिलासादायक ठरणार आहे.

# मुंबईच्या सिद्धिविनायक मंदिरातील दानपेटीतून पैसे चोरले... कर्मचाऱ्याला अटक

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबईतील सर्वात प्रतिष्ठित आणि भक्तांचे प्रमुख केंद्र असलेल्या श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर ट्रस्टमध्ये विश्वासाचा मोठा भंग झाल्याचे उघडकीस आले आहे. मंदिर ट्रस्टचाच एक कर्मचारी गेल्या अनेक महिन्यांपासून देणगी पेट्यांमधून कथितरित्या अपहार करत होता. दादर पोलिसांनी या कर्मचाऱ्याला अटक केली असून, पोलीस आणि मंदिर प्रशासनाला संशय आहे की, यात इतर अनेक कर्मचारीही सामील आहेत.

दादर पोलिसांच्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी मंदिर प्रशासनाने नियमित तपासणीदरम्यान सीसीटीव्ही फुटेज तपासले असता ही चोरी उघडकीस आली. फुटेजमध्ये काही कर्मचाऱ्यांच्या संशयास्पद हालचाली दिसून आल्या. फुटेजच्या सविस्तर तपासणीत असे दिसून आले की, काही कर्मचारी पुजाऱ्यांच्या खोलीत ठेवलेल्या आरतीच्या देणगी पेट्यांमधून कथितरित्या पैसे काढत होते. फुटेजमध्ये असेही दिसून आले की, कर्मचारी कधीकधी देणगी पेट्यांमध्ये हात घालत होते आणि कधीकधी पैसे काढण्यासाठी पेट्या तिरप्या किंवा उलट्या करत होते.



पोलिसांनी न्यू प्रभादेवी रोडवरील एका इमारतीत राहणाऱ्या राजेंद्र पेंडुरकर नावाच्या कर्मचाऱ्याला अटक केली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, तो २००९ पासून मंदिरात काम करत होता आणि बऱ्याच काळापासून ट्रस्टशी संबंधित होता. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास नियमित सीसीटीव्ही तपासणीदरम्यान पेंडुरकरच्या हालचाली संशयास्पद वाटल्या, त्यानंतर मागील दिवसांचे फुटेज तपासण्यात आले. तपासात असे उघड झाले की, तो पुजाऱ्यांच्या खोलीतील आरती दानपेटीजवळ वारंवार जात असे आणि तेथून पैसे काढत असे. प्राथमिक तपासात त्याने १०,००० रुपयांपेक्षा जास्त रक्कम चोरल्याचे निष्पन्न झाले आहे.

चौकशीदरम्यान, पेंडुरकरने गेल्या काही दिवसांपासून दानपेटीतून वारंवार पैसे काढल्याची कबुली दिल्याचे वृत्त आहे. तथापि, पोलिसांच्या तपासात आता असा संशय निर्माण झाला आहे की, हे प्रकरण केवळ एका कर्मचाऱ्यापुरते मर्यादित नसून एका संघटित रॅकेटचा भाग असू शकते. तपास अधिकाऱ्यांचा असा विश्वास आहे की, आरोपी आणि त्याच्याशी संबंधित इतर जण गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून दररोज सुमारे १०,००० रुपयांची देणगी काढत होते, ज्यामुळे ट्रस्टला मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे.

पोलिसांच्या म्हणण्यानुसार, आरोपी मंदिर बंद होण्याची वेळ किंवा दानपेट्या एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलवल्या जात असतानाचा फायदा घेत असत. या काळात, ते बोटांनी पेट्यांमधून नोटा काढत आणि कधीकधी पैसे काढण्यासाठी पेट्या वाकवतही असत, ज्यामुळे ही चोरी बराच काळ कोणाच्याही लक्षात आली नाही.

मंदिर ट्रस्ट प्रशासनाला या प्रकरणात अनेक कर्मचाऱ्यांचा सहभाग असल्याचा संशय आहे. मंदिर ट्रस्टच्या कार्यकारी अधिकारी वीणा पाटील यांनी दादर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी भारतीय दंड संहिता, २०२३ च्या कलम ३०६ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी सांगितले की, अटक केलेला आरोपी राजेंद्र पेंडुरकर याला न्यायालयात हजर करण्यात आले असून मंगळवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या संपूर्ण रॅकेटमध्ये सामील असलेल्या इतर कर्मचाऱ्यांची ओळख पटवण्यासाठी पोलीस आता गेल्या अनेक दिवसांचे आणि महिन्यांचे सीसीटीव्ही फुटेज तपासत आहेत.

# डिजिटल अरेस्टच्या नावाखाली 76 लाखांची फसवणूक...
## 'म्यूल अकाउंट' पुरवठादारास गुजरातमधून अटक

■मुंबई। प्रतिनिधी,

डिजिटल अरेस्टची भीती दाखवत एका 74 वर्षीय ज्येष्ठ नागरिकाची 76 लाख रुपयांची फसवणूक करणाऱ्या आरोपीला अटक करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. गुजरात येथून आरोपीला अटक करण्यात आली आहे. या कारवाईत डिजिटल अरेस्टची भीती दाखवत फसवणूक करणाऱ्या सायबर टोळीतील एका आरोपीला गुजरातमधील नॉर्थ रीजन सायबर पोलिसांनी अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, योगेश भोजा श्रीयन (74) यांची 76 लाखांची फुसवणूक करण्यात आली. डिजिटल अरेस्टची भीती दाखवत फसवणूक केल्याप्रकरणी पोलिसांनी जुगल कश्यपभाई माणेक (25) या आरोपीला अटक केली आहे. या प्रकरणात फसवणूक झालेले पीडित योगेश भोजा श्रीयन हे मुंबईतील दहिसर येथे राहणारे रहिवाशी आहेत. तसेच, अटक करण्यात आलेला आरोपी अहमदाबादचा रहिवासी आहे.




**नेमकं प्रकरण काय?**

पीडित योगेश भोजा श्रीयन यांना एका अनोळखी क्रमांकावरून फोन आला. फोन करणाऱ्यानं स्वतःला बेंगळुरूतील राजेंद्रनगर पोलीस ठाण्याचा अधिकारी ह्यअजय पाटीलह्न म्हणून ओळख करून दिली आणि त्यांच्या नावावर गंभीर गुन्हा दाखल असल्याचे सांगितले. चौकशीसाठी तातडीने बेंगळुरूला येण्यास सांगण्यात आले. त्यावेळी वय आणि प्रकृतीचं कारण देत त्यांनी जाण्यास नकार दिल्यावर, फोनवरच चौकशी करण्याचे सांगण्यात आले. त्यानंतर कॉल एका महिलेकडे ट्रान्सफर करण्यात आला. तिने स्वतःला सीबीआयची वरिष्ठ अधिकारी ह्यनवजोत सिम्मीह्न म्हणून ओळख करून दिली.

पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी जुगल कश्यपभाई माणेक हा सायबर ठगांना 'म्यूल अकाउंट' म्हणजेच बनावट किंवा भाड्याने घेतलेली बँक खाती उपलब्ध करून देत होता. फसवणुकीतील काही रक्कम त्याच्या खात्यामार्फत वळवण्यात आली होती. ही फसवणूक 27 जानेवारी रोजी सुरू झाली.

महिलेने पीडितांच्या मोबाईल क्रमांकावरून एका तरुणीला आक्षेपार्ह संदेश पाठविल्याचा आरोप केला. भीतीचे वातावरण निर्माण करण्यासाठी ठगांनी व्हॉट्सॲपवर आयकर विभाग आणि रिझर्व्ह बँकेच्या बनावट शिक्क्यांसह कागदपत्रे पाठवली. तसेच, ही बाब कुणालाही सांगितल्यास 7 वर्षांची शिक्षा आणि 58.83 लाख रुपयांचा दंड होईल, अशी धमकी दिली.

अटक आणि बदनामीच्या भीतीने घाबरलेल्या ज्येष्ठ नागरिकांनी ठगांच्या सांगण्यावर विश्वास ठेवला. 'अकाउंट व्हेरिफिकेशन'च्या नावाखाली त्यांच्याकडून बँक तपशील घेण्यात आले आणि विविध व्यवहारांद्वारे एकूण 76 लाख रुपये ठगांच्या खात्यांमध्ये वर्ग करण्यात आले. काही काळानंतर कोणतीही पडताळणी न झाल्याने आणि ठगांचा संपर्क तुटल्याने पीडितांना फसवणुकीची जाणीव झाली. त्यांनी तत्काळ नॉर्थ रीजन सायबर पोलिसांकडे तक्रार दाखल केली.

तपासादरम्यान पोलीस निरीक्षक किरण आहेर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने पैशांचा मागोवा घेत अहमदाबादमधील माणेकच्या खात्यापर्यंत पोहोचले. पोलिसांच्या मते, माणेक हा कमिशनच्या लालसेपोटी अशा खात्यांद्वारे फसवणुकीची रक्कम पुढे पाठवत असे आणि त्याबदल्यात सुमारे 10 टक्के कमिशन घेत असे. सध्या पोलिसांकडून स्वतःला पोलीस आणि सीबीआय अधिकारी म्हणून भासवून 'डिजिटल अरेस्ट'ची भीती दाखवणाऱ्या टोळीच्या मुख्य सूत्रधारांचा शोध सुरू आहे.

# विवाहित महिलेचा अश्लील व्हिडिओ बनवला अन्... एकाला अटक

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबईतून धक्कादायक बातमी समोर आली आहे. एका विवाहित महिलेला तिचा अश्लील व्हिडिओ बनवून ब्लॅकमेल करून तिच्याकडून लाखो रुपये उकळले असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी एका आरोपीला अटक केली आहे. या आरोपीची कसून चौकशी सुरू आहे. या व्यक्तीने इतरही अनेक महिलांची फसवणूक केल्याची शक्यता आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

**महिलेकडून 33 लाख रुपये उकळले**

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीने महिलेकडून तिच्या अश्लील व्हिडिओच्या नावाखाली 33 लाख रुपये घेतले होते, त्यानंतर महिलेला आपल्यासोबत काहीतरी चुकीचे घडत असल्याचे लक्षात आले. 18 तारखेला आपली चूक लक्षात आल्यावर त्या महिलेने आपल्या पतीला आत्महत्येचा संदेश पाठवला, त्यानंतर तिचा पती घरी आला आणि पत्नीची संपूर्ण कहाणी ऐकून त्याने मालवणी पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल केला.

**आरोपीला अटक, कारवाई होणार**

याबाबत बोलताना मालवणी पोलिस स्टेशनचे सहा पोलिस निरीक्षक दीपक जमदाडे यांनी सांगितले की, आरोपी भोंदूबाबा किंवा ज्योतिषी नाही आहे. तो मीरा रोड येथे राहणारा एक ड्रायव्हर आहे. त्याने फेसबुकवर महिलेशी मैत्री केली आणि नंतर, तिला बाहेर घेऊन जाण्याच्या बहाण्याने तिचा अश्लील व्हिडिओ बनवला, तिच्याकडून 33 लाख रुपये घेतले आणि तिला ब्लॅकमेल करत होता. आता आरोपीला अटक करण्यात आली आहे या आरोपीचे नाव अमर महागावकर आहे त्याच्यावर योग्य ती कारवाई केली जाणार आहे.

**महिलेचा अश्लील व्हिडिओ बनवला अन्..**

मुंबईतील मालवणी पोलिसांनी एका अशा व्यक्तीला अटक केली आहे, जो फेसबुकवर महिलांना फ्रेंड रिक्वेस्ट पाठवून, त्यांच्याशी ऑनलाइन चॅट करून आणि तिचे तिच्या नवऱ्याशी आणि सासूशी पटत नाही असे भविष्यवाणी करून तिचा विश्वास जिंकायचा आणि मग तिला कॉफी शॉपमध्ये भेटायला बोलवायचा. अशीच एक महिला त्याच्या जाळ्यात अडकली. त्याने महिलेचा विश्वास जिंकून तिला मार्वे बीचवर फिरायला बोलावले, तिच्या जवळ गेला आणि त्यांच्यासोबतचा व्हिडिओ बनवून तिला ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com